रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ वर्ष ९०

# कृषीवल

रायगड | सोमवार । दि. १७ ऑगस्ट २०२६ । अंक ७२ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


### २९ ऑगस्टच्या आंदोलनावर जरांगे ठाम

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी २९ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटीत आंदोलनाची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर अभ्यासकांसोबत झालेल्या बैठकीत सरकारसमोर यापूर्वी मांडलेल्या मागण्या, त्यासंबंधी कायदेशीर बाबी आणि सरकारच्या नव्या कार्यपद्धतीबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी सरकारने काढलेल्या शासन निर्णयातील चुका मान्य करून त्यात सुधारणा करावी, अशी मागणी जरांगे यांनी केली. २९ ऑगस्टच्या आंदोलनावर ठाम असल्याचे सांगत, कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याची तयारी असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### आशिष बॅनर्जींनी संपवलं जीवन

**नवी दिल्ली :** तृणमूल काँग्रेसचे नेते आणि पश्चिम बंगाल विधानसभेचे माजी उपाध्यक्ष आशिष बॅनर्जी यांचा रविवारी बीरभूम जिल्ह्यातील पक्ष कार्यालयात गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. घटनास्थळी आत्महत्येची चिठ्ठीही सापडली आहे. बॅनर्जी हे रामपूरहाट मतदारसंघातून सलग पाच वेळा आमदार राहिले होते. २०२६च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा भाजपच्या ध्रुव साहा यांच्याकडून पराभव झाला होता. आत्महत्येच्या चिठ्ठीत त्यांनी भ्रष्टाचाराच्या आरोपांचा इन्कार करत आपली बदनामी करण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा केला आहे. पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# साहेबांची ठेकेदारी, मुलांची उपासमारी!

## हजारो विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित; शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह




प्रमोद जाधव

**। रायगड ।**

**रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शंभर टक्के शालेय पोषण आहाराचा पुरवठा झाल्याचा शिक्षण विभागाकडून दावा केला जात असतानाच, संबंधित ठेकेदाराकडूनच जिल्ह्यात आतापर्यंत केवळ ३० टक्के पोषण आहाराचे वाटप झाल्याची कबुली देण्यात आल्याने शिक्षण विभागाचा दावा अक्षरशः उघडा पडला आहे. एका बाजूला कागदावर शंभर टक्के पुरवठा झाल्याचे सांगायचे आणि दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात केवळ ३० टक्के वाटप झाल्याचे ठेकेदारानेच मान्य करायचे, हा प्रकार नेमका काय आहे? विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या हक्काच्या पोषण आहाराच्या प्रश्नावर शिक्षण विभागाने वस्तुस्थिती मांडण्याऐवजी ठेकेदाराची बाजू घेण्याची घाई का केली, याचे उत्तर आता जनतेला हवे आहे. प्राथमिक विभागचे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी ठेकेदाराची 'ठेकेदारी' करण्याचा ठेका घेतलाय का, असा असावलही जनता विचारत आहे.**

ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यांच्या पोषणाची गरज भागवण्यासाठी प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना राबविली जाते. मात्र, रायगडमध्ये याच योजनेचा पुरवठा वेळेत होत नसल्याने हजारो विद्यार्थ्यांच्या ताटात पोषण आहार पोहोचलेला नाही. त्यामुळे 'साहेबांची ठेकेदारी आणि मुलांची उपासमारी' असे म्हणण्याची वेळ आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये जून-जुलै २०२६ या कालावधीतील ४० दिवसांसाठी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळास्तरावर धान्य व धान्यादी मालाचा पुरवठा करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी दिले आहेत. या पुरवठ्याचे काम जळगाव येथील श्रीसाई मार्केटिंग ॲण्ड ट्रेडिंग कंपनीला देण्यात आले आहे. विलंबाने पुरवठा झाल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, अशी अटही आदेशात असल्याचे सांगण्यात येते.

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या तब्बल २ हजार ४७३ शाळा असून सुमारे ७३ हजार विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्ष पुरवठ्याची स्थिती अत्यंत विस्कळीत असल्याचे तालुकानिहाय आकडेवारीवरून दिसून येते.

अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषदेच्या २१८ शाळा आहेत. त्यापैकी केवळ ६७ शाळांमध्ये पोषण आहार पोहोचल्याचे समोर आले आहे. वायशेत, चोंढी, धोकवडे, खानाव, सुडकोली, मेढेखार, सांबरी आणि वेश्वी केंद्रांच्या अखत्यारितील १५१ शाळांमध्ये अद्याप पोषण आहार पोहोचलेला नसल्याची माहिती आहे. त्यामुळे सुमारे तीन हजार विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित असल्याचे चित्र आहे.

रोहा तालुक्यात २४९ जिल्हा परिषद शाळांपैकी केवळ ४२ शाळांमध्ये पोषण आहार पोहोचला असून, तब्बल १९१ शाळा अद्याप प्रतीक्षेत आहेत. सुधागडमध्ये १४५ पैकी ६२ शाळांमध्ये पुरवठा झाला असून ८३ शाळांमध्ये तो झालेला नाही. मुरूडमध्ये ८३ पैकी ४२ शाळांमध्ये पोषण आहार पोहोचला असून, उर्वरित शाळांबाबतही प्रश्न कायम आहे.चार तालुक्यांतीलच हजारो विद्यार्थी पोषण आहाराच्या प्रतीक्षेत असताना, जिल्ह्यात शंभर टक्के पुरवठा झाल्याचा दावा कसा करण्यात आला, हा आता मुख्य प्रश्न आहे. शाळा सुरू होऊन तीन महिने झाले असून, ऑगस्ट महिन्याचे निम्म्याहून अधिक दिवस उलटले आहेत. तरीही पुरवठा सुरळीत झालेला नाही. परिणामी, विद्यार्थ्यांच्या हक्काचा

पान २ वर

### नाईकडे साहेब, ठेकेदाराची बाजू कशासाठी?

ठेकेदाराचे काम वेळेत झाले की नाही, यावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची आहे. ठेकेदाराकडून विलंब झाल्यास कारवाई करण्याची अट आदेशात असेल, तर विद्यार्थ्यांना वेळेवर पोषण आहार न मिळाल्याबद्दल जबाबदारी निश्चित करण्याऐवजी त्यांची बाजू घेण्याची गरज काय? प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी विद्यार्थ्यांच्या हिताची बाजू घ्यायची की ठेकेदाराची?

> संचालकांकडून यावर्षी शालेय पोषण आहार वाटपाचा आदेश उशिरा आला. त्यामुळे पोषण आहार वाटप उशिरा सुरु केले. मागील तीन दिवसांपासून सुरुवात केली आहे. अलिबागमध्ये मोठ्या प्रमाणात वाटप करण्यावर भर दिला आहे. आतापर्यंत फक्त तीस टक्के वाटप केले आहे. दहा दिवसांपर्यंत शंभर टक्के वाटप करण्याचा प्रयत्न राहील.
>
> **– अनुपम कुलकर्णी, उपठेकेदार**

### स्वतंत्र चौकशी व्हावी?

ज्ञानदान करणाऱ्या यंत्रणेतील वरिष्ठ अधिकारीच वस्तुस्थितीपेक्षा वेगळी माहिती देत असतील, तर विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणाचा धडा कोण शिकवणार? प्रशासनाने तातडीने जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये प्रत्यक्ष किती पोषण आहार पोहोचला, किती शाळा वंचित आहेत आणि विलंबाला जबाबदार कोण, याची स्वतंत्र चौकशी करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांच्या ताटातील घास हा कोणत्याही ठेकेदाराच्या सोयीपेक्षा मोठा आहे. त्यामुळे 'शंभर टक्के'च्या कागदी दाव्याऐवजी शाळेच्या वर्गात आणि विद्यार्थ्यांच्या ताटात सत्य किती टक्के आहे, हे शिक्षण विभागाने जनतेसमोर मांडावे.

# महाड एमआयडीसीतील वायूगळतीचे दोन बळी



- ३६ कामगार बाधित
- इंडो अमाईन्स कंपनीत दुर्घटना

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड एमआयडीसीतील इंडो अमाईन्स या रसायन कंपनीत शनिवारी १५ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६ वाजता झालेल्या भीषण एचसीएल वायू गळतीच्या घटनेत रविवारी आणखी एक बळी गेला आहे. या दुर्घटनेतील मृतांचा आकडा आता दोनवर पोहोचला आहे.

इंडो अमाईन्स कंपनीतील एका कामगाराचा कालच उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. त्यानंतर आज कंपनीच्या समोरील विरल कंपनीत काम करणाऱ्या कल्पेश वांद्रे (३१ वर्षे, रा. बोरगाव) यांचा मुंबईतील अपोलो हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला.

काल झालेल्या वायू गळतीचा फटका केवळ इंडो अमाईन्सपुरता मर्यादित राहिला नाही. वारा आणि कंपनीच्या लोकेशनमुळे समोरील विरल कंपनीतील जवळपास ३० ते ३५ कामगारांना या विषारी वायूची मोठ्या प्रमाणात बाधा झाली. त्यापैकी कल्पेश वांद्रे यांची प्रकृती सर्वात गंभीर होती. याच रस्त्याने प्रवास करणाऱ्या एका तरुणीला देखील अचानक वायूचा झटका बसला असून, ती सध्या खासगी दवाखान्यात उपचार घेत आहे. तिची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती आहे.

सकाळी घटनास्थळी महाड पोलीस प्रशासन, फॅक्टरी इन्स्पेक्टर आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी दाखल झाले असून, पंचनामा करण्याचे काम सुरू आहे. मात्र "घोडा गेल्यावर तबेला बंद" अशीच ही कृती असल्याची तीव्र भावना स्थानिक नागरिकांमध्ये आहे. या घटनेनंतर महाड एमआयडीसी परिसरातील नागरिक प्रचंड संतप्त झाले आहेत. इंडो अमाईन्समध्ये यापूर्वीही अशा छोट्या-मोठ्या

पान २ वर

# श्रीवर्धनमध्ये नगरसेवकाला जीवे मारण्याची धमकी!

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन नगरपरिषदेचे प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक प्रणील चंद्रकांत बोरकर यांना हात-पाय तोडून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात निखिल पोलेकर (४२, रा. बागमांडला) याच्याविरोधात अदखलपात्र अपराध अहवाल दाखल करण्यात आला आहे.

प्रभाग क्रमांक ६ मधील पथदिवे आणि सार्वजनिक साफसफाईच्या कामावरून संबंधित व्यक्तीचा नगरसेवक बोरकर यांच्यावर राग असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याच कारणावरून आरोपीने नगरसेवकांना शिवीगाळ करत हात-पाय तोडण्याची तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

या घटनेनंतर नगरसेवक बोरकर यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी नोंद केली आहे. या प्रकरणाचा तपास श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल नारायण मारुती हिंदोला करीत आहेत.

## वेधक

### शिंदेंच्या माजी नगरसेवकाकडून गोळीबार

**नवी दिल्ली :** वाराणसीच्या लाल बहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळावर शस्त्र तपासणीदरम्यान शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक कमलेश राय यांच्या परवानाधारक पिस्तुलातून अचानक गोळी सुटल्याने दोन सुरक्षा कर्मचारी जखमी झाले. ही घटना रविवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. कमलेश राय हे पत्नीसह मुंबईला जाण्यासाठी एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानाने प्रवास करणार होते. शस्त्र तपासणी सुरू असताना पिस्तुलातून गोळी सुटली आणि ती आधी जमिनीवर आदळून दोन कर्मचाऱ्यांना लागल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे. जखमींना रुग्णालयात दाखल केले आहे.

### शेतकऱ्यांचा दिल्लीकडे मोर्चा

**नवी दिल्ली :** हिंदुस्थान-अमेरिका व्यापार कराराला विरोध आणि विविध मागण्यांसाठी संयुक्त किसान मोर्चाने पुन्हा दिल्लीकडे कूच करण्याची घोषणा केली आहे. शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंजाब-हरियाणा सीमेवरील खनौरी बॉर्डर रविवारी पूर्णपणे सील करण्यात आली असून, हरियाणा पोलिसांनी मोठा बंदोबस्त आणि बॅरिकेडिंग केले आहे. शेतकरी नेते जगजीत सिंह डल्लेवाल यांनी १६ ऑगस्टपासून २२८ किलोमीटरची 'किसान बचाओ पदयात्रा' काढण्याची घोषणा केली आहे. दाता सिंह वाला गावातून सुरू होणारी ही पदयात्रा २९ ऑगस्ट रोजी दिल्लीतील जंतर-मंतरवर पोहोचणार आहे.

### काळ नदीत तरुण वाहून गेला

**महाड :** रायगड जिल्ह्यात महाड तालुक्यातील पाने परिसरात काळ नदीच्या पात्रात २० वर्षीय वेदांत बोंडलेकर वाहून गेल्याची घटना घडली. पाण्यात मौजमजा करताना नदीच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो पाण्यात वाहून गेल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली. नदीपात्र तसेच परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आली असून, बेपत्ता तरुणाचा शोध घेण्यासाठी बचाव पथकाकडून प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, पावसाळ्यात नदी, धबधबे आणि जलाशयांमध्ये उतरताना पर्यटकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

### पुढील पाच दिवस पावसाचा इशारा

**नवी दिल्ली :** देशातील अनेक भागांत पुढील पाच दिवस पावसाची शक्यता असून, भारतीय हवामान विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे. काही भागांत मुसळधार पावसासह मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ६० ते ८० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडमध्ये १६ ते २१ ऑगस्टदरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज आहे. दिल्ली, हरयाणा, चंदीगड आणि पंजाबमध्येही पावसाची शक्यता आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड तसेच कोकण, गोवा, गुजरात, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात २१ ऑगस्टपर्यंत पाऊस सुरू राहण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

# रॉकविल रिसॉर्टला वॉटर स्पोर्ट्सची परवानगीच नाही!

- पर्यटन संचालनालयाचे कोलाड पोलिसांना पत्र
- चौकशी करून कारवाईचे निर्देश

**। रोहा । प्रतिनिधी ।**

कोलाड परिसरातील धगडवाडी येथील रॉकविल रिसॉर्टमध्ये रिव्हर राफ्टिंगदरम्यान मुंबईतील पर्यटकाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाला आता गंभीर वळण मिळाले आहे. संबंधित रॉकविल रिसॉर्टला वॉटर स्पोर्ट्स अथवा रिव्हर राफ्टिंग उपक्रमासाठी पर्यटन संचालनालयाकडून कोणतीही परवानगी किंवा मान्यता देण्यात आलेली नसल्याचे लेखी स्वरूपात स्पष्ट झाले आहे. या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी, असे पर्यटन संचालनालयाच्या कोकण विभागीय कार्यालयाने कोलाड पोलिसांना पत्राद्वारे कळविले आहे.

कोलाड परिसरात रिव्हर राफ्टिंगदरम्यान मनोज अमर नाथ या पर्यटकाचा मृत्यू झाल्यानंतर या घटनेबाबत पर्यटन विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत पर्यटन विभागाने ४ ऑगस्ट २०२६ रोजी कोलाड पोलिसांना पत्र पाठविले आहे.

तक्रारीनुसार, ११ जुलै २०२६ रोजी धगडवाडी येथील रॉकविल रिसॉर्टमध्ये रिव्हर राफ्टिंगदरम्यान मनोज अमर नाथ यांचा मृत्यू झाला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर पर्यटन संचालनालयाने संबंधित रिसॉर्टला वॉटर स्पोर्ट्स किंवा रिव्हर राफ्टिंग उपक्रम चालविण्यासाठी आपल्या विभागाकडून कोणतीही परवानगी अथवा मान्यता देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

पान २ वर

### मृत्यूची जबाबदारी कोणाची?

रिव्हर राफ्टिंगसारख्या साहसी पर्यटन उपक्रमात पर्यटकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असणे अपेक्षित आहे. मात्र, ज्या उपक्रमासाठी पर्यटन संचालनालयाची कोणतीही मान्यता नसल्याचे आता समोर आले आहे, त्या उपक्रमाचे संचालन कशाच्या आधारावर केले जात होते, याचा तपास पोलिसांनी करणे आवश्यक आहे. या दुर्घटनेनंतर केवळ अपघात म्हणून प्रकरणाकडे न पाहता रिसॉर्टचा रिव्हर राफ्टिंग व्यवसाय, त्यासाठी घेतलेल्या परवानग्या, सुरक्षा व्यवस्था, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि संबंधित यंत्रणांकडून करण्यात आलेल्या तपासण्या यांचीही चौकशी होण्याची गरज आहे.

### पर्यटन विभागाने पोलिसांकडे सोपविली जबाबदारी

तक्रारीच्या अनुषंगाने पर्यटन संचालनालयाने कोलाड पोलिसांना प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे पोलिसांच्या तपासात रिव्हर राफ्टिंग उपक्रमाचे संचालन नेमके कोणाच्या परवानगीने सुरू होते आणि या दुर्घटनेला जबाबदार कोण, याचा उलगडा होणे अपेक्षित आहे.

# कर्जाचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक

- रोहा पोलिसांनी दोघांना तात्काळ ठोकल्या बेड्या
- कार, रोकड, मोबाईलसह बनावट शिक्के जप्त

**। रोहा । प्रतिनिधी ।**

व्यवसायासाठी तब्बल २० लाख रुपयांचे कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत विविध कारणांसाठी पैसे उकळून आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोघांना रोहा पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून बनावट कागदपत्रे, पतसंस्थेचे शिक्के, पावती पुस्तके, रोकड, मोबाईल आणि कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, आतापर्यंतच्या तपासात या आरोपींनी रोहा परिसरातील तब्बल २३ जणांची कर्जाचे आमिष दाखवून फसवणूक केल्याचे समोर आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

रोहा तालुक्यातील सुडकोली येथील लियाकत महमद खोत यांनी वर्तमानपत्रातील जाहिरात पत्रिकेत 'समर्थ फायनान्शियल सर्विसेस'च्या माध्यमातून व्यवसायिक कर्ज, महिलांसाठी बचतगट तसेच लघुउद्योगासाठी ५ ते १५ लाख रुपयांपर्यंत कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल, अशी जाहिरात पाहिली होती. त्यानंतर जाहिरातीमध्ये दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला असता आरोपींनी २० लाख रुपयांचे कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखविले.

कर्ज मंजुरीच्या प्रक्रियेसाठी विविध कारणे सांगून फिर्यादीकडून तब्बल ४६ हजार ४०० रुपये घेण्यात आले. त्यानंतर विजयलक्ष्मी पतसंस्था मर्यादित, पालघर या संस्थेच्या नावाने शेअर्स दिल्याचे तसेच कर्ज मंजूर झाल्याचे भासविणारी बनावट कागदपत्रे देण्यात आली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने रोहा पोलिसांत तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक तसेच रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभय शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक शिवराम खाडे यांच्या पथकान

पान २ वर

**शार्लोट लेकचे पाणी सोडल्याप्रकरणी वाद | जिल्हाधिकाऱ्यांनी मागवला अहवाल**

# ऐन पावसाळ्यात माथेरानचा पाणीप्रश्न पेटला

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख स्रोत असलेल्या शार्लोट लेकचे पाणी नगरपरिषदेने १० ऑगस्टनंतर वारंवार सोडल्याच्या प्रकाराची रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी गंभीर दखल घेतली आहे. भरपावसात तलावातील पाणी का सोडण्यात आले, यासह संपूर्ण घटनाक्रमाचा अहवाल सादर करण्याची नोटीस माथेरान नगरपरिषदेला बजावण्यात आली आहे.



शार्लोट लेकमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचला असून, तो काढण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. १० ऑगस्ट रोजी गाळ वाहून जावा या उद्देशाने पाणी सोडण्यात आले. मात्र, त्यानंतरही गाळ कायम राहिल्याने काही दिवस पाणी अडविणे आणि पुन्हा सोडणे सुरू असल्याचा आरोप आहे.

दरम्यान, तलावातील तब्बल एक हजार ट्रक गाळ काढल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, एवढा गाळ प्रत्यक्षात कुठे गेला, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत असून, या दाव्याचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे.

शार्लोट लेकच्या पाणी व्यवस्थापनात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची भूमिका महत्त्वाची आहे. असे असताना पाणी सोडण्याचा निर्णय घेताना जीवन प्राधिकरणाला तसेच संबंधित प्रशासकीय यंत्रणांना विश्वासात घेतले होते का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. माथेरान मॉनिटरिंग समितीची परवानगी घेण्यात आली होती का, याचीही चौकशी होणार आहे.

तलावातील पाणी सोडण्याच्या विहिरीची

पान २ वर

# कुर्डुस ते सुतकवाडी रस्त्याची चाळण!

- वर्षभरापासून डांबरीकरण रखडले
- नागरिकांसह वाहनचालकांचे हाल, आंदोलनाचा इशारा



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कुर्डुस ते सुतकवाडी दरम्यानच्या सुमारे चार किलोमीटर रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून, रस्त्यात खड्डे की खड्ड्यांत रस्ता, असा सवाल संतप्त ग्रामस्थांकडून केला जात आहे. वर्षभरापूर्वी रस्ता खोदून त्यावर बीबीएम टाकण्यात आले; मात्र त्यानंतर डांबरीकरणच झाले नसल्याने पावसाळ्यात मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालकांसह नागरिक आणि विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

रस्त्याच्या

पान २ वर

# बनावट रॉयल्टी पासांचा पर्दाफाश

## • वाहनमालकांवर कारवाईचा फास; मिळकतखार बेकायदेशीर भराव प्रकरण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील मिळकतखार येथील बेकायदेशीर माती-मुरूम भराव प्रकरणाला आता निर्णायक वळण मिळाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नावाने बनावट वाहतूक पास वापरल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर या भरावासाठी वापरण्यात आलेल्या दोन डंपरची माहिती आरटीओकडून प्राप्त झाली आहे. त्यानंतर अलिबाग तहसीलदार विक्रम पाटील यांनी संबंधित वाहनमालक व चालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश मंडळ अधिकारी सारळ यांना दिले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ठ पत्रकार संजय गंगाराम सावंत, विनय कडवे आणि जगदीश म्हात्रे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यामुळे यश आले आहे.

मिळकतखार येथील गट क्रमांक ४७/२, ४९, ५० व ५१ मधील वासवानी यांच्या मिळकतीमध्ये मोठ्या प्रमाणावर माती-मुरूमाचा भराव करण्यात येत असल्याची तक्रार करण्यात आली होती. विशेष म्हणजे, हा परिसर सीआरझेड, कांदळवन व ना-विकास क्षेत्राशी संबंधित असल्याने प्रकरणाचे गांभीर्य वाढले होते.

भरावासाठी वापरण्यात आलेले वाहतूक पास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नावाने असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, जिल्हा खनिकर्म विभागाने महाखनिज प्रणालीच्या माध्यमातून केलेल्या पडताळणीत सदर पास महाखनिज प्रणालीवर अस्तित्वातच नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे हे पास बनावट असल्याचे समोर आले.

**दोन डंपरची माहिती प्रशासनाच्या हाती**

बेकायदेशीर भरावासाठी वापरण्यात आलेल्या वाहनांची माहिती मिळविण्यासाठी तहसीलदार कार्यालयाने पेण आरटीओकडे पत्रव्यवहार केला होता. माहिती मिळण्यास विलंब होत असल्याने संजय सावंत यांनी स्वतंत्रपणे पाठपुरावा केला. त्यानंतर आरटीओकडून दोन वाहनांची माहिती प्रशासनाला प्राप्त झाली. यामध्ये एमएच ०६ एक्यू १५९१ या टाटा टिपरचा मालक मच्छिंद्र कृष्णा पाटील (रा. रायांदे, चरी, पोयनाड, अलिबाग) आणि एमएच ४३ बीपी ६३९३ या टाटा एलपीके २५१८ टिपरचा मालक निखिल नरेश थळे (रा. कोळगाव, सासवणे, अलिबाग) असल्याचे समोर आले आहे.

### तहसीलदारांचा थेट आदेश

वाहनमालकांची माहिती प्राप्त होताच तहसीलदार विक्रम पाटील यांनी मंडळ अधिकारी सारळ यांना पत्र देऊन दोन्ही वाहनांच्या मालकांसह चालकांवर योग्य ती कडक कायदेशीर कारवाई करून त्याचा अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या आदेशामुळे मिळकतखार येथील बेकायदेशीर भराव प्रकरणात आता प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### बनावट पासचा सूत्रधार कोण?

दोन डंपरची माहिती आणि त्यांच्यावर कारवाईचे आदेश झाले असले तरी बनावट रॉयल्टी पास तयार करून ते वापरण्यामागे नेमके कोण आहे, हा सर्वांत मोठा प्रश्न अद्याप कायम आहे. सरकारी यंत्रणेच्या नावाने बनावट पास तयार होत असतील आणि त्यांचा वापर करून सीआरझेड व कांदळवन क्षेत्रात भराव होत असेल, तर हा केवळ वाहनमालकांचा विषय नसून या संपूर्ण साखळीचा तपास होणे गरजेचे आहे. बनावट पास तयार करणारे, त्यांचा वापर करणारे आणि बेकायदेशीर भरावाचे सूत्रधार यांच्यापर्यंत प्रशासनाचा कारवाईचा हात पोहोचणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.



## महादेवखार येथे वृक्षारोपण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून श्री. जाखमाता सेवा मंडळ, मुंबई-महादेवखार यांच्या वतीने शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी महादेवखार येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी विविध ठिकाणी वृक्षलागवड केली.

या उपक्रमाला मंडळाचे संस्थापक राज जोशी, अध्यक्ष अनिल ना. मोरे, उपाध्यक्ष प्रदीप गायकर, ज्येष्ठ सदस्य काशिनाथ जोशी, ग्रामपंचायत माजी सदस्य चंद्रकांत कांबळे, भालचंद्र मोरे तसेच मंडळाचे अन्य सदस्य उपस्थित होते. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने देशसेवेसोबतच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. वृक्षलागवडीबरोबरच लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचा संकल्पही यावेळी करण्यात आला.

## मंगला वढावकर यांचे निधन

**नागोठणे :** नागोठण्यातील गांधी चौक परिसरातील आणि प्रभू आळी येथील रहिवासी श्रीमती मंगला त्रिंबक वढावकर (८७) यांचे गुरुवार, दि. १३ ऑगस्ट रोजी पहाटे वृद्धापकाळाने आकस्मिक निधन झाले आहे. नागोठण्यातील सीकेपी समाजातील संजय वढावकर यांच्या त्या मातोश्री होत.



दिवंगत मंगला वढावकर यांच्या पार्थिवावर अंबा घाटावरील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वढावकर यांचे आप्तेष्ट, सगेसोयरे, मित्रपरिवार, नागोठणे शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# आवंडे-तोरणपाडा पूल धोकादायक

## ■ प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठा अनर्थ होण्याची भीती

**। पाली/वाघोशी । प्रतिनिधी ।**

आवंडे पेढलीपासून आवंडे ते तोरणपाडा या गावांना जोडणारा पूल सध्या अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, अरुंद व जिर्ण झालेल्या या पुलाकडे प्रशासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आवंडे येथील शिवसैनिक अशोक देशमुख (उबाठा गट) यांनी केला आहे.

या पुलाची दुरुस्ती व्हावी यासाठी शासन आणि प्रशासनाकडे अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला. मात्र, अद्याप या पुलावर कोणत्याही प्रकारचे ठोस दुरुस्तीचे काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे पुलाची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे.



यंदाच्या पावसाळ्यात पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी गेले. पाण्याचा जोर वाढल्याने पूल वाहून जाण्याच्या स्थितीत आला होता. भविष्यात एखाद्या मुसळधार पावसात हा पूल तुटला अथवा वाहून गेला, तर परिसरातील अनेक गावांचा संपर्क पूर्णपणे तुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिक, विद्यार्थी, शेतकरी तसेच अत्यावश्यक सेवांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. पूल तुटल्यानंतर प्रशासन जागे होऊन उपयोग काय? मोठा अनर्थ होण्यापूर्वीच प्रशासनाने या पुलाची तातडीने पाहणी करून दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, अशी मागणी अशोक देशमुख यांनी केली आहे. प्रशासनाने केवळ पाहणी व आश्वासनांपुरते मर्यादित न राहता तातडीने निधी उपलब्ध करून पुलाचे मजबुतीकरण व आवश्यक दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी देशमुख यांनी केली आहे. दरम्यान, पावसाळ्यात या पुलाची परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने प्रशासन आता तरी गांभीर्याने दखल घेणार का, असा सवाल विचारला जात आहे.

# पोलीस असल्याचे भासवून टेम्पोचालकाला लुटण्याचा प्रयत्न

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत-पळसदरी मार्गावर पोलीस असल्याचे भासवून टेम्पोचालकाला अडवून त्याच्याकडील वाहनाची चावी हिसकावण्याचा प्रयत्न केल्याची घटना १४ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास घडली.

यावेळी आरोपींपैकी एकाने स्वयंपाकघरातील चाकूने चालकाच्या उजव्या हातावर दुखापत केली. तसेच हात तोडण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

फिर्यादी मोहन हे टेम्पो क्रमांक एमएच-०५-ईएल-७२९३ घेऊन कर्जत-खोपोली मार्गाने जात होते. पळसदरी रस्त्यावरील बंद टोलनाक्याच्या पुढे सुमारे २०० मीटर अंतरावर तीन अज्ञात आरोपींनी संगनमत करून त्यांची रिक्षा टेम्पोसमोर आडवी केली. त्यानंतर आरोपींनी आपण पोलीस असल्याचे सांगत तपासणी सुरू असल्याचे भासविले. त्यापैकी एका आरोपीने टेम्पोची चावी मागितली. चावी देण्यास नकार देताच त्याने खिशातील चावीला लावण्यात येणाऱ्या स्वयंपाकघरातील चाकूने फिर्यादीच्या उजव्या हातावर वार करून दुखापत केली. त्यानंतर आरोपींनी हात तोडण्याची धमकी दिली. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल पवार करीत आहेत.

## इसांबे येथे ट्रकची कंटेनरला धडक

**। खालापूर । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर इसांबे गावाच्या हद्दीत ट्रकने पुढे असलेल्या अज्ञात कंटेनरला धडक दिल्याची घटना १४ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसहाच्या सुमारास घडली. या अपघातात ट्रकचालकाला किरकोळ दुखापत झाली असून, ट्रकचेही नुकसान झाले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, द्रुतगती मार्गावरील कि.मी. २३.६०० जवळ अशोक लेलँड कंपनीचा एमएच-४६-बीयू-९०२२ क्रमांकाचा ट्रक चालक आरोपी याने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन बेदरकारपणे चालविले.

# शहाबाज येथे रोहित्रातील तांब्याची कॉईल चोरीला

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पोयनाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शहाबाज येथे अज्ञात चोरट्याने वीज रोहित्रातील तांब्याची कॉईल चोरून नेल्याची घटना १२ ऑगस्ट रोजी रात्री २ ते १३ ऑगस्ट रोजी रात्री २ वाजण्याच्या दरम्यान घडली. या चोरीत एकूण २५ हजार ५०० रुपयांचे नुकसान झाले आहे.

शहाबाज येथील वेरिटास इन्फ्रा कंपनीच्या आवारातील मोकळ्या जागेत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या देखरेखीखाली असलेल्या डीटीसी क्रमांक १३८४३२० मधील ६३ केव्हीए क्षमतेच्या रोहित्रातील तांब्याची कॉईल अज्ञात चोरट्याने चोरीच्या उद्देशाने काढून नेली. याप्रकरणी पोयनाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहायक फौजदार नवनाथ म्हात्रे करीत आहेत. सरकारी मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांना तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

पान १ वरून

## साहेबांची ठेकेदारी, मुलांची उपासमारी!

आहार वेळेवर मिळत नसून, काही ठिकाणी शिक्षकांवर स्वखर्चाने विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्याची वेळ आल्याची माहिती समोर येत आहे.

या सगळ्या प्रकारात सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित ठेकेदाराच्या प्रतिनिधीनेच 'आतापर्यंत फक्त ३० टक्के वाटप झाले आहे' अशी स्पष्ट कबुली दिली आहे. त्यांच्यानुसार, संचालकांकडून यावर्षी शालेय पोषण आहार वाटपाचा आदेश उशिरा आल्याने वितरणाला विलंब झाला असून, मागील तीन दिवसांपासून वाटप सुरू करण्यात आले आहे. अलिबागमध्ये मोठ्या प्रमाणात वाटप करण्यावर भर असून, पुढील दहा दिवसांत शंभर टक्के वाटप करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे ठेकेदार स्वतः ३० टक्के वाटप झाल्याचे सांगत असताना, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नाईकडे यांचयाकडून शंभर टक्के पुरवठ्याचा दावा नेमका कोणत्या आधारावर करण्यात आला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी ठेकेदारांचा ठेका घेतलाय का? याचे उत्तर रायगडातील जनतेला हवे आहे.

## ऐन पावसाळ्यात माथेरानचा पाणीप्रश्न पेटला

चावी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात असल्याचे सांगण्यात येत असल्याने ती चावी कोणी उपलब्ध करून दिली आणि कोणाच्या आदेशाने पाणी सोडण्यात आले, याकडेही लक्ष लागले आहे. तसेच गाळमिश्रित पाणी मोरबे धरणात गेल्याचा आरोप असल्याने त्याचीही प्रशासनाकडून दखल घेतली जाण्याची शक्यता आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नगरपरिषदेकडून संपूर्ण अहवाल मागविल्याने आता पाणी सोडण्याचा निर्णय नेमका कोणाच्या आदेशाने झाला आणि त्याची जबाबदारी कोणाची, हे स्पष्ट होणार आहे. या चौकशीकडे माथेरानकरांचे लक्ष लागले आहे.

## महाड एमआयडीसीतील वायूगळतीचे दोन बळी

गळतीचे प्रकार होत असतात. फॅक्टरी इन्स्पेक्टर नियमित तपासणी करतात असं फक्त कागदावर दाखवतात. प्रत्यक्षात सुरक्षा व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा थेट आरोप नागरिकांनी केला.

कामगारांच्या जीवाशी खेळणाऱ्या या कंपन्यांना तात्काळ बंद करा. अधिकारी हातावर हात धरून बसतात आणि आम्ही मरतो. कल्पेशसारखे आणखी किती बळी जाणार? असा सवाल करत नागरिकांनी इंडो अमाईन्ससह परिसरातील सर्व धोकादायक रसायन कंपन्यांवर कारवाई करण्याची आणि त्या बंद करण्याची मागणी केली आहे.

एकीकडे अधिकृत आकडेवारी लपवण्याचा प्रयत्न होत असताना, दुसरीकडे गळतीनंतर तातडीने परिसरातील कंपन्यांना अलर्ट न दिल्याने आणि बचाव यंत्रणा अपुरी असल्याने फॅक्टरी इन्स्पेक्टरच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या दुर्घटनेमागे कोण जबाबदार? फक्त कंपनी प्रशासन की त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरलेली शासकीय यंत्रणा? हा प्रश्न आज भयग्रस्त महाडकर विचारत आहेत.

घटनेनंतर प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी शशिकांत पवार आणि एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी रावडे यांनी घटनास्थळी भेट दिली. कंपनीविरोधातील चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. तसेच वायूगळतीबाबत कंपनी व्यवस्थापनाकडून चुकीची माहिती देण्यात आली असल्यास त्याचीही चौकशी करून कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

विशेष म्हणजे, रात्री गंभीर दुर्घटना घडूनही दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत पोलिसांकडे घटनेची प्राथमिक माहिती उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे कंपनी व्यवस्थापन आणि संबंधित यंत्रणांमधील समन्वयावरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. या घटनेप्रकरणी अद्याप कंपनी प्रशासनाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे की नाही याबत स्पष्टता नाही. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## कर्जाचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक

तपासाची चक्रे वेगाने फिरवली. अखेर १५ ऑगस्ट रोजी दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये ओमकार रवींद्र हटले (४०, सध्या रा. बदलापूर, ठाणे; मूळ रा. गोठणे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग) आणि गौरव संतोष मयेकर ऊर्फ भालचंद्र रघुनाथ पालव (३८, सध्या रा. उलवे, नवी मुंबई; मूळ रा. मठ, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग) यांचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींकडून सुमारे पाच लाख रुपये किमतीची ह्युंदाई व्हर्ना कार (एमएच ०५ बीएल ००९५), ३० हजार रुपये रोख, सुमारे एक लाख रुपये किमतीचा सॅमसंग झेड फोल्ड ४ मोबाईल आणि आणखी एक सुमारे एक लाख रुपये किमतीचा मोबाईल जप्त केला आहे. याशिवाय पतसंस्थेच्या नावाचे बनावट शिक्के, पावती पुस्तके, नागरिकांना दिलेल्या पावत्या, आधारकार्ड, धनादेश पुस्तिका, पासबुक तसेच अन्य महत्त्वाची कागदपत्रे पोलिसांच्या हाती लागली आहेत.

या प्रकरणाचा तपास सुरू असतानाच आरोपींनी रोहा परिसरातील आणखी २३ जणांना कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याचे आतापर्यंतच्या तपासात समोर आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे.

या आरोपींकडून आणखी कोणाची आर्थिक फसवणूक झाली असल्यास संबंधितांनी रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभय शेलार किंवा तपासी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक शिवराम खाडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या कारवाईत पोलीस नाईक कैलास बेल्हेकर, पोलीस कॉन्स्टेबल अनिल पाटील, अमित चाळेकर आदींचा सहभाग होता. पुढील तपास रोहा पोलीस करीत आहेत.

## रॉकविल रिसॉर्टला वॉटर स्पोर्ट्सची परवानगीच नाही!

पर्यटन संचालनालयाकडूनच परवानगी नसल्याचे स्पष्ट झाल्याने आता रिव्हर राफ्टिंगचा हा उपक्रम नेमका कोणत्या परवानगीच्या आधारे सुरू होता, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याशिवाय संबंधित उपक्रमासाठी इतर शासकीय विभागांची आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का, सुरक्षा नियमांचे पालन करण्यात आले होते का आणि पर्यटकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक साधने व प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध होते का, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे.

दरम्यान, पर्यटनासाठी कोलाड परिसराची वाढती ओळख पाहता साहसी पर्यटनाच्या नावाखाली नियम आणि सुरक्षेला बगल दिली जात नाही ना, याची तपासणी करण्याची गरज आहे. एका पर्यटकाचा जीव गेल्यानंतर परवानगीचा मुद्दा समोर येत असल्याने प्रशासनाच्या देखरेखीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता या प्रकरणातील चौकशीतून सत्य बाहेर येऊन दोषींवर कारवाई होते का, याकडे स्थानिक नागरिक आणि पर्यटकांचे लक्ष लागले आहे.

## कुर्डुस ते सुतकवाडी रस्त्याची चाळण!

दुरुस्तीसाठी स्थानिक प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामसेवक, स्थानिक आमदार आणि जिल्हा परिषद सदस्यांकडूनही या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

कुर्डुस ते सुतकवाडी, कुर्डुस ते आनंदवाडी आणि कुर्डुस ते डांगी या मार्गांचीही दुरवस्था झाली आहे. विशेषतः शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, या रस्त्यांची कामे पूर्ण झाल्याचे दाखवून प्रत्यक्षात कामे न करताच बिले काढण्यात आल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रस्ते झाले नसतील तर कामे पूर्ण झाल्याची बिले काढली कोणी? याची चौकशी झालीच पाहिजे, अशी मागणी होत आहे.

प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षाचा फटका कुर्डुसकरांना सहन करावा लागत असून, रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून डांबरीकरण करण्यात आले नाही, तर जनआंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# लाखो भाविकांचे श्रद्धास्थान श्रीक्षेत्र पाटणेश्वर

श्रावण महिना म्हटला की डोळ्यांसमोर उभे राहते ते भगवान शंकराचे रूप आणि मनात जागी होते ती भक्तीची भावना. उपास-तापास, व्रत-वैकल्ये, सोमवारची पूजा आणि महादेवाच्या दर्शनासाठी मंदिरांकडे जाणाऱ्या भाविकांची गर्दीया सगळ्यामुळे श्रावण महिन्याला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. पावसाच्या रिमझिम सरींनी निसर्ग हिरवागार झालेला असताना शिवभक्तीचा सुगंधही वातावरणात दरवळत असतो.



पेण शहरापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेले श्रीक्षेत्र पाटणेश्वर हे अशाच भक्ती आणि निसर्गाच्या सुंदर संगमाचे ठिकाण आहे. गावाच्या पश्चिमेला हिरव्यागार झाडीत, डोंगररांगांच्या कुशीत आणि निसर्गरम्य वातावरणात वसलेले हे मंदिर भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. मंदिराच्या परिसरात प्रवेश करताच मनाला एक वेगळीच शांतता अनुभवायला मिळते. सभोवतालचा निसर्ग, मंदिरातील पवित्र वातावरण आणि शिवनामाचा गजर मनाला भक्तिरसात चिंब भिजवून टाकतो.

**संतोष पाटील**

पाटणेश्वराच्या स्थापनेमागेही एक श्रद्धा आणि चमत्काराची कथा सांगितली जाते. सुमारे दोनशे ते अडीचशे वर्षांपूर्वी एका शेतकऱ्याला आपल्या शेतात नांगरताना नांगराच्या फाळाला काहीतरी लागल्याचे जाणवले. तेथे रक्त वाहत असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. प्रथमदर्शनी एखादा साप किंवा अन्य प्राणी जखमी झाला असावा, असे त्याला वाटले. मात्र बारकाईने पाहिले असता एका पाषाणातून रक्ताची धार वाहत असल्याचे त्याच्या लक्षात आले.

ही घटना पाहून तो शेतकरी घाबरला आणि गावात येऊन त्याने हा प्रकार ग्रामस्थांना सांगितला. ही बातमी परिसरात वाऱ्यासारखी पसरली. गावकरी शेतात गेले असता त्या पाषाणामध्ये शिवपिंड असल्याचे त्यांना दिसून आले. श्रद्धेने भारावलेल्या ग्रामस्थांनी त्या ठिकाणी पूजा-अर्चा सुरू केली आणि पुढे याच ठिकाणी श्री पाटणेश्वराची स्थापना करण्यात आली.

पाटणेश्वराची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण ओळख म्हणजे मंदिरासमोरील तलाव. या तलावामध्ये पूर्वी अपोआप उगवणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या कमळांची फुले पाहायला मिळत असत. वर्षातून एकदा तरी उमलणारी ही कमळे भाविकांसाठी आकर्षणाचे केंद्र होती. शिवपिंड आणि कमळांनी नटलेला हा परिसर म्हणजे निसर्ग आणि अध्यात्म यांचा अद्भुत मिलाफच जणू!

अंतरावरील पाटणोळी हे निसर्गाच्या कुशीत विसावलेले छोटेसे गाव. उत्तरेकडे अंतोरा बंदर, सभोवताली फळबागांचे मळे आणि भातशेतीने नटलेला परिसरया सगळ्यामुळे पाटणेश्वर परिसराला एक वेगळीच निसर्गसंपन्नता लाभली आहे. या निसर्गरम्य वातावरणात पाटणेश्वराचे दर्शन घेताना मन नकळत भक्तिभावाने भरून जाते.

"ॐ नमः शिवाय"चा जप करत पाटणेश्वराच्या मंदिरात प्रवेश करणाऱ्या भाविकांना मनःशांतीचा अनुभव येतो. त्यामुळेच पुढे पुढे या मंदिराची ख्याती वाढत गेली आणि आज हे ठिकाण हजारो नव्हे तर लाखो भाविकांच्या श्रद्धेचे स्थान बनले आहे.

महाशिवरात्री आणि श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी येथे भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. दूरदूरहून शिवभक्त पाटणेश्वराच्या दर्शनासाठी येतात. मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण होते आणि "हर हर महादेव", "ॐ नमः शिवाय"च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून जातो. मंदिरासमोरील दगडी दीपस्तंभही या परिसराचे एक वैशिष्ट्य आहे. त्रिपुरी पौर्णिमेला येथे भव्य दीपोत्सव साजरा केला जातो. असंख्य दिव्यांच्या प्रकाशाने मंदिर परिसर उजळून निघतो. त्या वेळी निर्माण होणारे दृश्य म्हणजे श्रद्धा, परंपरा आणि प्रकाश यांचा अद्भुत सोहळाच असतो.

पाटील कुटुंबीय आपल्या कौटुंबिक कार्यातून या देवस्थानाची सेवा सातत्याने करीत आहेत. भाविकांना दर्शन घेताना गैरसोय होऊ नये, यासाठी विशेष दक्षता घेतली जाते. पाटील कुटुंबातील युवकही हिरिरीने मंदिराच्या व्यवस्थापनात सहभागी होत असतात. आजच्या धावपळीच्या जीवनात मनाला क्षणभर विसावा देणारी, श्रद्धेला बळ देणारी आणि निसर्गाच्या सान्निध्यात आत्मिक समाधान देणारी स्थळे अत्यंत महत्त्वाची आहेत. श्रीक्षेत्र पाटणेश्वर हे त्यापैकीच एक.

पेणची धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख अधिक समृद्ध करणाऱ्या या पवित्र स्थळाला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा आणि पाटणेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा, अशी मागणीही पुढे येत आहे. भाविकांची श्रद्धा, ग्रामस्थांचे योगदान आणि प्रशासनाची साथ मिळाली, तर पाटणेश्वर हे केवळ पेणचे नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्ह्याचे एक महत्त्वाचे आध्यात्मिक पर्यटनस्थळ म्हणून निश्चितच नावारूपाला येऊ शकते.

निसर्गाच्या कुशीत वसलेले मंदिर, शतकांची श्रद्धा आणि शिवनामाचा अखंड गजरहीच श्रीक्षेत्र पाटणेश्वराची खरी ओळख!



• (छायाचित्र : महेश पवार)

## गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी प्रमोद नागोठणेकर

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

येथील केएमजीचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची सन-२०२६ ची नवीन कार्यकारिणी गणेशोत्सव मंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत जाहीर करण्यात आली आहे. गणेशोत्सव मंडळाचे हे ६७ वे वर्ष असून, मंडळाच्या अध्यक्षपदी यावर्षी प्रमोद वसंत नागोठणेकर यांची निवड करण्यात आली आहे.

गणेशोत्सव मंडळाच्या उर्वरित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष रुपेश जगताप, सचिव संदेश जाधव, खजिनदार तुकाराम खांडेकर गुरुजी, सहसचिव संतोष नागोठणेकर, सह खजिनदार गितेश पोटे, कार्याध्यक्ष श्रीधर नागोठणेकर, कार्याध्यक्ष सुनील लाड, कार्याध्यक्ष गणेश घाग, कार्यवाहक विजय नागोठणेकर, कार्यवाहक संतोष चितळकर, कार्यवाहक संतोष घाग यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीत गणेशोत्सवात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाविषयी चर्चा करण्यात आले.

## वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कारवाई

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांविरोधात पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू ठेवला आहे. १४ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकूण २३५ जणांवर कायदेशीर कारवाई केली. या कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

## निवडक

### उलव्यात २५ हजारांचा गांजा जप्त

**पनवेल :** उलवे सेक्टर २१ परिसरात बेकायदेशीरपणे गांजाची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला उलवे पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. त्याच्याकडून ५३० ग्रॅम गांजा आणि गांजा विक्रीतून मिळालेली २ हजार रुपयांची रोकड, असा एकूण २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुंगीकारक औषधी व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उलवे पोलीस ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत होते. यावेळी सेक्टर २१ मधील गार्डनच्या कोपऱ्याजवळील रस्त्यावर एक व्यक्ती संशयास्पदरीत्या उभा असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांना पाहताच त्याने तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून सायंकाळी सातच्या सुमारास त्याला ताब्यात घेतले. यावेळी त्याने आपले नाव इम्रान इम्तियाज शेख (३२) असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता प्लास्टिकच्या पिशवीत २५ हजार रुपये किमतीचा ५३० ग्रॅम गांजा आढळून आला. तसेच, गांजा विक्रीतून मिळालेली २ हजार रुपयांची रोकडही त्याच्याकडे सापडली. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, हा गांजा त्याला आसिफ मुस्तफा शेख याने विक्रीसाठी दिल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी गांजा आणि रोकड असा एकूण २७ हजार रुपयांचा मुद्देमाल सीलबंद करून जप्त केला. या प्रकरणी इम्रान इम्तियाज शेख आणि आसिफ मुस्तफा शेख यांच्याविरोधात गुंगीकारक औषधी व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तुषार बच्छाव करीत आहेत.



### वडाळे सरोवराला गवताचा विळखा

**खांदा कॉलनी :** पनवेलमधील वडाळे सरोवर परिसरात मुसळधार पावसामुळे पुन्हा मोठ्या प्रमाणावर गवत वाढल्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे वडाळे सरोवराचे रूपांतर गवताळ प्रदेशात झाले की काय, असा प्रश्न पनवेलकरांकडून उपस्थित केला जात आहे.पावसामुळे वडाळे सरोवराच्या काठावर तसेच पाण्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर गवत वाढले आहे. त्यामुळे सरोवराचे नैसर्गिक सौंदर्य झाकोळले जात आहे. गवत वाढल्यामुळे सरोवरातील जैवविविधतेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. तसेच, वाढलेल्या गवतामुळे डास आणि कीटकांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती देखील नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे याचा त्रास परिसरातील नागरिक आणि सकाळी फिरण्यासाठी येणाऱ्यांना होत आहे. दरम्यान, सरोवर परिसरात नियमित स्वच्छता आणि देखभाल करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली होती. त्याची दखल घेत पनवेल पालिकेने सरोवरातील गवत काढण्यास सुरुवात केली आहे. पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून सरोवर परिसरातील वाढलेले गवत हटविण्याचे काम सुरू आहे. मात्र, केवळ तात्पुरती साफसफाई न करता नियमित देखभाल करण्याची अपेक्षा पनवेलकरांकडून व्यक्त होत आहे.

### जाळ्यात अडकलेल्या नागाला जीवदान

**खांदा कॉलनी :** उरण तालुक्यात नागपंचमीच्या पार्श्वभूमीवर सर्पसंवर्धनाचा संदेश देणारी घटना घडली. कुंडेगाव येथील लक्ष्मण पाटील यांच्या बागेतील जाळ्यात अडकलेल्या नागाची सर्पमित्र राहुल पाटील यांनी सुटका करून त्याला नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडले. दि.१५ ऑगस्ट रोजी लक्ष्मण पाटील यांच्या बागेत नाग जाळ्यात अडकल्याचे निदर्शनास आले. हा नाग आदल्या दिवसापासून जाळ्यात अडकलेला असूनही जिवंत असल्याची माहिती मिळताच दादरपाडा येथील सर्पमित्र राहुल पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. बागेत मोठ्या प्रमाणात पाणी साचले असल्याने त्यांनी पाण्यात उतरून जाळ्यासह नागाला रस्त्यावर आणले.त्यानंतर कात्रीच्या सहाय्याने जाळे काळजीपूर्वक कापून नागाची सुटका करण्यात आली. त्यानंतर त्याला चिरनेर येथील जंगल परिसरात सुरक्षितपणे सोडण्यात आले. नागपंचमीला नागपूजा करण्यापेक्षा सापांचे संरक्षण आणि त्यांना नैसर्गिक अधिवासात सुरक्षित सोडणे, हाच खरा सर्पसंवर्धनाचा संदेश असल्याचे राहुल पाटील यांच्या या कृतीतून दिसून आले.



### श्रेयांश तुपकरचा सन्मान

**खांब :** रोहा तालुक्यातील मुठवली खुर्द गावातील श्रेयांश तुपकर याचा स्पर्धा परीक्षेतील यशाबद्दल विशेष सन्मान करण्यात आला आहे. मागील शैक्षणिक वर्षात मंथन राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत श्रेयांश याने चांगले गुण संपादित करून संपूर्ण तालुक्यात तिसरा येण्याचा बहुमान पटकावला. त्यामुळे त्याचा दि.१५ ऑगस्ट रोजी ग्रामस्थ व तरूण मंडळ तसेच प्राथमिक शाळा व शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी सरपंच कविता शेळके, गाव अध्यक्ष तानाजी ठमके, पोलीस पाटील राम सावंत, मारुती तुपकर, महेश तुपकर, मंगेश तुपकर, राम ठमके, राजेंद्र खारिवले, संतोष तुपकर, विशाल शिंदे, धनराज शिंदे, प्रकाश तुपकर, विठ्ठल शिंदे, महेंद्र शेळके, परेश ठमके, महादेव शेळके, विनायक सावंत, ओंकार खंडागळे, ऋषी खंडागळे, सतेज खारिवले, रजनी शेळके, मुख्याध्यापिका वैशाली वेळे, अनिल सुटे व शाळा व्यवस्थापक समिती अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

# पाली शहरात माकडांचा हैदोस

- घरांमध्ये घुसून अन्नपदार्थांची नासधूस
- यावर वन विभागाकडून ठोस उपाययोजना नाही

**| सुधागड–पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील पाली शहर आणि परिसरात माकडांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, येथील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. माकडे थेट नागरिकांच्या घरांमध्ये घुसून भाजीपाला, अन्नपदार्थ तसेच घरातील वस्तू घेऊन जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही ठिकाणी माकडांमुळे घरांच्या पत्र्यांचे देखील नुकसान होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, या समस्येबाबत वन विभागाकडे वारंवार निवेदने व तक्रारी करूनही अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याची नाराजी नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

पालीकरांमध्ये माकडांच्या वाढत्या वावरामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घरांच्या गॅलरी, खिडक्या तसेच टेरेसवरून माकडे थेट घरात प्रवेश करत असल्याने विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. माकडांना हुसकावून लावताना नागरिकांवर हल्ला होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. दरम्यान, पाली शहरातील माकडांच्या उपद्रवाबाबत वन विभागाकडे नागरिकांकडून वारंवार निवेदने व तक्रारी करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. समस्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही प्रत्यक्ष पाहणी, प्रतिबंधात्मक उपाययोजना तसेच नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करण्यासाठी ठोस पावले उचलली जात नसल्याची नाराजी नागरिक व्यक्त करत आहेत. त्यामुळे पाली नगरपंचायत आणि वन विभागाने समन्वय साधून माकडांच्या वाढत्या उपद्रवावर



तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. त्याचबरोबर माकडांना मानवी वस्तीत येण्यास कारणीभूत ठरणारा उघड्यावरचा कचरा व अन्नपदार्थ याबाबतही योग्य नियोजन करण्याची गरज आहे. वारंवार निवेदने व तक्रारी करूनही समस्या कायम राहणार असेल, तर नागरिकांच्या तक्रारींची दखल नेमकी कधी घेतली जाणार? एखादी गंभीर घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवाल आता पालीकरांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, वन विभागाने नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी आणि परिस्थितीनुसार ठोस उपाययोजना कराव्यात. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन वन विभागाने माकडांचा वावर असलेल्या भागांची प्रत्यक्ष पाहणी करावी, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घ्यावे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायदेशीर व सुरक्षित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

#### प्रतिबंधात्मक उपाययोजनेची गरज

माकडांचा उपद्रव केवळ भाजीपाला किंवा घरातील वस्तूंच्या नुकसानीपुरता मर्यादित राहिलेला नसून, माकडे थेट घरांमध्ये प्रवेश करत असल्याने भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे एखादी अनुचित घटना घडल्यानंतर कारवाई करण्याऐवजी त्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे विभागाने कायदेशीर आणि सुरक्षित पद्धतीने या समस्येवर उपाययोजना करणे अपेक्षित आहे.

### कोलाडकरांमध्ये भीतीचे वातावरण

**कोलाड :** येथील पद्मावती नगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून माकडांनी धुमाकूळ घातल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जवळच जंगल असल्यामुळे जंगलातील माकडांच्या टोळ्या थेट मानव वस्तीत येऊन घरांच्या छतांवर येऊन उड्या मारत आहेत. त्यामुळे घरांच्या सिमेंट पत्र्यांचे नुकसान होत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. ही माकडे घरांच्या छतांवर उड्या मारत असतात. तसेच, त्यांच्याकडून पत्रे हलवणे, परिसरातील वस्तूंचे नुकसान करण्याचे प्रकार सुरू आहेत. त्यामुळे घराबाहेर पडताना नागरिकांना विशेष काळजी घ्यावी लागत असून, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडण्याच्या अगोदर संबंधित वनविभागाने तातडीने पाहणी करून माकडांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



● श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात ताजी मासळी येत असून, काहीशी स्वस्त दरात मिळत असल्याने खवय्ये मासळीवर ताव मारतात. त्यामुळे रविवारी (दि.१६) मासळी खरेदीसाठी अलिबाग मासळी बाजारात खवय्यांनी प्रचंड गर्दी केली होती. (छायाचित्र : समीर मालोदे)

## पनवेल बाजारात मातीच्या नागांची आवक

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

श्रावण महिन्यातील पहिला सण असलेल्या नागपंचमीचा उत्साह नागरिकांमध्ये पाहायला मिळत आहे. नागपंचमीच्या पार्श्वभूमीवर रविवारी (दि.१६) पनवेलच्या भाजी बाजारात मातीच्या नागांच्या मूर्ती विक्रीसाठी दाखल झाल्या. त्यामुळे नागपंचमीच्या पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याचीही बाजारात मोठ्या प्रमाणावर खरेदी सुरू होती.



नागपंचमीच्या दिवशी पूजेसाठी जिवंत नाग पकडणे किंवा त्याचा वापर करणे टाळणे आवश्यक आहे. वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी जिवंत नागाची पूजा करण्याऐवजी मातीच्या नागाची पूजा करण्याचे आवाहन करण्यात येते. नाग हा शेतकऱ्यांचा मित्र मानला जातो. शेतातील उंदीर तसेच अन्य पिकांना नुकसान करणाऱ्या प्राण्यांवर नियंत्रण ठेवण्यात नागाची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे नागपंचमीच्या निमित्ताने सर्पसंवर्धनाचा संदेश देण्याची गरज व्यक्त होत आहे. नागांना पकडून त्यांची पूजा करण्यापेक्षा त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. नागपंचमीच्या निमित्ताने नागरिकांनी वन्यजीवांविषयी संवेदनशीलता दाखवावी, असे आवाहन करण्यात येत आहे. त्यामुळे पनवेल बाजारपेठेत मातीच्या नागांसह पूजेच्या साहित्याची खरेदी करण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू होती.

## मार्गाला प्रथम नगराध्यक्षांचे नाव

**| खोपोली | प्रतिनिधी |**

खोपोली नगरपरिषदेचे पहिले नगराध्यक्ष कैलासवासी गोवर्धनदास तन्ना यांच्या स्मृतींना उजाळा देत नगरपरिषदेच्या बाजारपेठेतील मुख्य मार्गाला त्यांचे नाव देण्यात आले. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य आणि तन्ना यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात नगराध्यक्ष कुलदीपकभाई शेंडे यांच्या हस्ते या मार्गाचे लोकार्पण करण्यात आले. खोपोली नगरपरिषदेच्या स्थापनेनंतर शहराच्या जडणघडणीत तन्ना यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. नगरपरिषदेचे पहिले नगराध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य आणि शहराच्या विकासासाठी दिलेले योगदान यावेळी मान्यवरांनी अधोरेखित केले. त्यांच्या कार्याची आठवण कायम राहावी, यासाठी शहरातील प्रमुख मार्गाला त्यांचे नाव देण्यात आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, नगरसेवक समीर मसुरकर, सभापती, आजी–माजी नगरसेवक व नगरसेविका, व्यापारी, पदाधिकारी, नागरिक तसेच तन्ना परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## रोह्यात रंगणार दहीहंडीचा थरार

**| चणेरा | प्रतिनिधी |**

यंदाच्या दहीहंडी उत्सवाला आता अवघे काही दिवस शिल्लक असताना रोहा तालुक्यात गोविंदा पथकांनी जोरदार सरावाला सुरुवात केली आहे. गावोगावी मंदिरांसमोर, शाळांच्या पटांगणात तसेच मोकळ्या मैदानांवर ७ ते ८ थरांचे मानवी मनोरे रचण्याचा थरारक सराव सुरू असून, गोविंदा पथकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. त्यामुळे यंदा रोह्यात दंहीहंडीचा थरार रंगणार असल्याचे बोलले



जात आहे.

रोहा तालुक्यातील कालभैरव बोरघर, जय बजरंग लाढंर, तळाघर, निवी, धाटाव, किल्ला, रोठ खुर्द, देवकान्हे, नागोठणे, आमडोशी, कडसुरे यांसह अनेक गावांतील गोविंदा पथकांनी यंदाच्या दहीहंडी उत्सवाची तयारी सुरू केली आहे. प्रत्येक पथकामध्ये साधारण १०० ते १२० गोविंदा एकत्र येत असून, आपल्या गावाच्या नावाला मान मिळवून देण्यासाठी उंचच उंच मानवी मनोरे रचण्याचा निर्धार केला जात आहे.

गेल्या ८ ते १० दिवसांपासून पथकांचा नियमित सराव सुरू आहे. सायंकाळी साडेसात ते रात्री नऊ–साडेनऊ वाजेपर्यंत जवळपास दोन तास गोविंदा मैदानावर घाममगाळताना दिसत आहेत. दिवसभराची कामे आटोपून, शेतातून तसेच कामावरून परतल्यानंतरही अनेक गोविंदा सरावाला प्राधान्य देत आहेत. ''एक थर वाढवायचा, पण सुरक्षिततेची काळजी घ्यायची'' या उद्देशाने अनुभवी गोविंदांच्या मार्गदर्शनाखाली सराव केला जात असून, यंदा कोणते पथक किती उंच मनोरा रचणार, याची उत्सुकता आतापासूनच निर्माण झाली आहे.

### लग्नाचे आमिषाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**रोहा :** अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवून गर्भवती केल्याचा गंभीर प्रकार रोहा तालुक्यातील हनुमान टेकडी येथे घडल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार १ एप्रिल रोजी मध्यरात्रीपासून १४ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीपर्यंतच्या कालावधीत हनुमान टेकडी परिसरात घडला. आरोपीला पीडित मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही त्याने तिला हनुमान टेकडीवर नेले. तेथे लग्न करण्याचे आश्वासन देत तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेत वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे. या प्रकारातून पीडित मुलगी गर्भवती झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गंभीर प्रकरणाचा अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक रुपाली पाटील करीत आहेत.

## विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी लॅबचे उद्घाटन



**| खरोशी | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील मायनी कोयना येथील राजिप प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी नव्या इंग्लिश लॅबचे उद्घाटन पार पडले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इंग्रजी भाषेचे प्रभावी शिक्षण मिळावे, तसेच त्यांच्यामध्ये इंग्रजी संभाषण कौशल्य आणि संगणकीय ज्ञान विकसित व्हावे, या उद्देशाने ही इंग्लिश लॅब उपलब्ध करून देण्यात आली आहे. या इंग्लिश लॅबचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या ताई दरवडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते जोमा दरवडा, गागोदे केंद्राचे केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अंजना पवार, सामाजिक कार्यकर्ते विजय पवार, लक्ष्मण पवार, माजी उपसरपंच सुभाष पवार, अनिल पवार, प्रवीण पवार, शिक्षक, पालक आणि इतर मान्यवरांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांच्या हातात तंत्रज्ञानाचे बळ आणि ज्ञानाची नवी कवाडे खुली करण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरला आहे. या विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणासोबतच डिजिटल माध्यमातून इंग्रजी भाषा शिकण्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून घेण्याची संधी मिळणार आहे.

## पर्यावरण संवर्धनासाठी हिरवी चळवळ

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

कालोते मोकाशी ठाकूरवाडी येथील आदिवासी नवतरुण मित्र मंडळाच्यावतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण उपक्रम उत्साहात पार पडला. मंडळाच्या जवळपास १०० ते १५० तरुणांनी एकत्र येत विविध प्रकारच्या झाडांची लागवड केली. परिसरात हिरवळ वाढविणे, स्वच्छ हवा मिळावी आणि नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग घेत झाडांची लागवड केली. तसेच, लावलेल्या रोपांची योग्य निगा राखण्याचा संकल्प केला. वृक्षारोपणामुळे तरुणांना निसर्गाशी जोडले जाण्याची संधी मिळाली असून, पर्यावरण रक्षणाची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम नियमितपणे राबविण्याचा निर्धार मंडळाच्या सदस्यांनी व्यक्त केला. या उपक्रमासाठी खालापूर वन विभागानेही सहकार्य केले. वृक्षारोपण उपक्रमाबद्दल कालोते मोकाशी ठाकूरवाडी येथील आदिवासी नवतरुण मित्र मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी वनविभाग अधिकारी जितेंद्र शिंदे, राम शिगवा, हेमंत शिगवा, मनोहर सांबरे, काशिनाथ शिंगवा, तानाजी शिंगवा, महेश हिरवे, लक्ष्मण वारे, लक्ष्मण शिंगवा, रवेश निरगुडे, हरिश्चंद्र शिंगवा, बाळू वीर, अजित निरगुडे आदी नवतरुण उपस्थित होते.



झुगरेवाडी जिल्हा परिषद शाळेत इंग्रजी लॅबचे उद्घाटन | विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यासाठी फायदा

# आदिवासी भागातील शिक्षणाला दिशा देणारे पाऊल

**| नेरळ | प्रतिनिधी |**

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान आधारित शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राजिपचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी भरत बास्तेवाड यांनी एक प्लॅन तयार केला होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राजिपच्या झुगरेवाडी शाळेत इंग्रजी लॅब मंजूर करण्यात आली होती. त्या अंतर्गत या शाळेला पाच संगणक संच देण्यात आले असून, त्या संगणकात इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतचा अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आला आहे. त्याचा निश्चितच फायदा इंग्रजी विषयाची भीती दूर करून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यासाठी होणार आहे.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून कर्जत तालुक्यातील झुगरेवाडी येथील जि.प. शाळेत इंग्रजी लॅब सुरू करण्यात आली. आदीवासी भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इंग्रजी भाषेचे प्रभावी शिक्षण मिळावे, तसेच त्यांच्यामध्ये इंग्रजी संभाषण कौशल्य



आणि संगणकीय ज्ञान विकसित व्हावे, या उद्देशाने ही इंग्लिश लॅब उपलब्ध करून देण्यात आली आहे. या लॅबचे उद्घाटन कर्जत पंचायत समितीच्या सदस्या कविता शिंगवे आणि केंद्रीय प्रमुख अमोल चोळके यांचे हस्ते झाले. या कार्यक्रमासाठी सरपंच बेबी पादीर, मुख्याध्यापक रवी काजळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष वसंत पारधी, पोलीस पाटील जनार्धन पारधी, नारायण शिंगवा, सुनील सावळा, राजश्री पाटील, जनार्धन निरगुडा, लक्ष्मण पादीर, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> “रायगड जिल्ह्यातील उपक्रमशील शाळा झुगरे वाडीत या लॅबचे उद्घाटन होत आहे, ही निश्चित आमच्या नांदगाव केंद्रासाठी भूषणावह बाब असून, विद्यार्थ्यांना त्याचा खूप फायदा होईल यात तिळमात्र शंका नाही.”
> – अमोल चोळके, केंद्रीय प्रमुख, नांदगाव

> “आमच्या आदिवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी झुगरे वाडी शाळेत राबविण्यात येत असलेले उपक्रम कौतुकास्पद असून, इंग्रजी ची भीती असणाऱ्या विद्यार्थ्यांना या लॅब चा भविष्यात खूप फायदा होईल व त्यांचा आत्मविश्वास वाढीस लागेल.”
> – कविता शिंगवा, सदस्य, पंचायत समिती

## आर्थिक जागरूकता प्रदर्शन उत्साहात



**| तळा | प्रतिनिधी |**

तळा शहरातील द.ग. तटकरे महाविद्यालयाच्या वाणिज्य विभाग आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने ‘आर्थिक जागरूकता प्रदर्शन’ मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता, सुरक्षित डिजिटल व्यवहार, बचत, गुंतवणूक आणि आर्थिक फसवणुकीपासून संरक्षण याबाबत होता. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या विकास समितीचे सदस्य दत्तात्रय सप्रे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना दैनंदिन आर्थिक व्यवहारांमध्ये जागरूकता बाळगणे आणि सुरक्षित डिजिटल पेमेंट पद्धतींचा वापर करणे किती महत्त्वाचे आहे, हे स्पष्ट केले. तसेच, प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी बँकिंग सेवा, व्यवहार, डिजिटल पेमेंट, ऑनलाइन बँकिंग, बचत, गुंतवणूक, विमा आणि सायबर फसवणूक टाळण्याचे विविध उपाय यावर आधारित अत्यंत कल्पक व माहितीपूर्ण तक्ते, मॉडेल सादर केले.

# जुन्या कल्पना, नवी कारंजी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लालकिल्ल्यावरून केलेल्या भाषणामध्ये नेहमीप्रमाणे शब्दांचे आणि कल्पनांचे फुलोरे उडवले आहेत. आता विकासाची सप्तधारा या भरतभूमीमध्ये अवतरणार आहे असे मोदी म्हणाले. उद्योग, शेती, आयटी, वीजनिर्मिती, तेलउत्पादन अशांमध्ये देश भरारी घेणार आहे असे त्यांनी सांगितले. उद्योगांमध्ये सुट्या भागांपासून ते मोठ्या उत्पादनापर्यंत सर्व काही भारतात तयार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. शेतमालाचे नुसते उत्पादन करण्याऐवजी त्यावर प्रक्रिया करून त्यांची किंमत वाढवणे व परदेशात निर्यात करणे यावर भर दिला जाईल. रोबो वगैरे आधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी भारताने इनोव्हेशन हब व्हायला हवे असे मोदी म्हणाले. रेल्वे तसेच रस्ते मार्ग वाढवणे इत्यादींना त्यांनी गतिशक्ती असे संबोधले. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याची गरज व्यक्त केली. मत्स्यशेतीमधून विकासाची हाक त्यांनी दिली. शिवाय योगसाधना, भारतीय संगीत, हस्तकला इत्यादींमधून भारताचा प्रभाव जगभरात वाढवण्यावरही त्यांनी भर दिला. हे सगळे ऐकल्यावर यात नवीन ते काय असा प्रश्न कोणालाही पडेल. गेली किमान बारा वर्षे याच गोष्टींचा उद्घोष वेगवेगळ्या नावांनी चालू आहे. यापूर्वी भारतात उत्पादन क्षेत्र वाढायला हवे म्हणून मेक इन इंडिया नामक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्याच्या लोगोवर आणि जाहिरातीवरच दोन-पाचशे कोटी रुपये खर्च झाले असतील. इतर देशातून आयात करण्याऐवजी उद्योजकांनी भारतातच वस्तूंचे उत्पादन करावे असे ते आवाहन होते. भारताच्या प्रगतीसाठी ते आवश्यक व चांगलेच होते. पण प्रचंड प्रचार, मोदींचे आवाहन आणि जाहिरातबाजी करूनही ते घडले नाही. आज मेक इन इंडियाचे नाव खुद्द मोदीही घेत नाहीत. त्याऐवजी सप्तधारा वगैरे बोलतात. हे चांगले लक्षण नाही. मेक इन इंडियाच नव्हे तर सप्तधारांमधील शेती, तंत्रज्ञान अशा प्रत्येक विषयाच्या संदर्भात मोदींनी दिमाखदार घोषणा आणि नेत्रदीपक सोहळे केलेले आहेत. पण ते यशस्वी का झालेले नाहीत याचा कधी विचार केलेला नाही. याचे कारण मुळात हे अपयशी झाले आहेत हेच मान्य करायला ते तयार नाहीत व दहशत अशी आहे की, पोपट मेला आहे हे बादशहाला सांगायचे कोणी असा प्रश्न आहे.

## हे करायला अडवले कोणी?

स्वातंत्र्यदिनाला सगळा देश एक असतो. त्यावेळी पंतप्रधान जे संकल्प करतात त्याकडे आशावादी पध्दतीनेच पाहायला हवे हे खरे आहे. पण या भाषणात जुन्या आणि फसलेल्या गोष्टी पुन्हा नवीन लेबलखाली सांगितल्या जात असतील तर त्यावर टीका होणे अपरिहार्य आहे. भारतात तयार होणाऱ्या शेतीमालापैकी ४० टक्के शेतमाल हा कोल्ड स्टोरेज किंवा साठवणुकीची इतर काही व्यवस्था नसल्यामुळे वाया जातो असे अधिकृत अहवाल आहेत. टोमॅटो, कोथिंबिर, पालेभाज्या, फळे यांचा होत असलेला नाश आपण नित्य पाहतो. सरकारी गुदामांमध्ये साठवलेल्या लाखो टन गहू व तांदुळाबाबतही हे घडते. या ४० टक्क्यांची किंमत सुमारे एक लाख कोटी रुपये होते. यावर उपाय करण्याचे दावे मोदींनी अनेकदा केले. पण ते घडलेले नाही. म्हणूनच पुन्हा २०२६च्या स्वातंत्र्यदिनाला त्याविषयी बोलावे लागते आहे. ते पुन्हा नव्याने ऐकल्यासारखे करणे व मोदींची तारीफ करणे हे केवळ अंधभक्तांनाच शक्य आहे. वास्तविक ते जे बोलत आहेत ते त्यांच्याच सरकारने करणे अपेक्षित आहे हे त्यांना कोणीतरी सांगायला हवे. महिला आरक्षणासाठी विरोधकांनी सहकार्य करावे व त्याचे श्रेयही हवे तर घ्यावे असे मतलबी आवाहनही पंतप्रधानांनी पुन्हा एकवार केले. महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे विधेयक यापूर्वीच संसदेत संमत झालेले आहे. ते तात्काळ लागू करणे मोदींना शक्य आहे. बहुसंख्य राज्यांमध्ये भाजपचेच बहुमत आहे. पण ते न करता या राखीव जागांची सांगड मतदारसंघ पुनर्रचनेशी घालण्याचा खोडा मोदी सरकारने घालून ठेवला आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अशी फेररचना झाली की दक्षिणेकडच्या राज्यांना फटका बसणार आहे. त्यावर तोडगा निघालेला नाही. उत्तरेकडची हिंदी राज्ये भारतावर सध्याची वर्चस्व गाजवत असतात. फेररचना झाली तर ८०० सदस्यांच्या संसदेत पाचशे सदस्य यांचेच होतील. त्यामुळे हिंदी राज्ये किंवा महाराष्ट्राच्या मतांना नगण्य किंमत राहील. भाजपने यावर सर्वसहमतीने तोडगा काढण्याऐवजी विरोधक महिलाविरोधी आहेत असा प्रचार करण्यासाठी या मुद्द्याचा वापर केला आहे. पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून पुन्हा तेच करावे हे दुर्दैवी आहे.

## नक्षलवादाच्या नावाने

जंतरमंतरवरच्या आंदोलनाने भाजपची सध्या चांगलीच तंतरली आहे. त्याचे पडसाद या भाषणात उमटणार हे अपेक्षितच होते. त्यानुसार युवाशक्तीचा गजर मोदींनी केला. मी ही मरमर करतो आहे ती तुमच्यासाठीच ना असे एखाद्या बापाने मुलांना ऐकवावे तसे मोदींनी २०४७ च्या विकसित भारताचा सर्वाधिक फायदा तरुणांनाच होणार आहे असे बोलून दाखवले. युवाशक्तीने पुढे येऊन देशाचा विकास घडवावा असे ते वारंवार म्हणाले. देशातील स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोफत कोचिंग आणि एक कोटी तरुणांना एआयचे प्रशिक्षण अशा योजना त्यांनी जाहीर केल्या. नीट पेपरफुटीच्या आंदोलनामध्ये कोचिंग क्लासवरचा लाखोंच्या खर्चाची चर्चा झाली होती. मोदींनी त्यावर फुकट कोचिंगचा उपाय सांगितला हे ठीक आहे. पण हे या प्रश्नावरचे खरे उत्तर नव्हे. खासगी कंपन्यांमध्ये सुरक्षित नोकरी नाही, स्वयंरोजगार करण्याची स्थिती नाही आणि आपल्या कॉलेजपर्यंतच्या शिकण्याचा कशालाच उपयोग नाही अशी सध्याच्या मुलांची अवस्था आहे. यासाठी शाळा-कॉलेजांमधील अभ्यासक्रम आमूलाग्र बदलणे, सर्वांना मोफत शिक्षण मिळेल अशी व्यवस्था करणे, तरुणांना स्वतःचे उद्योग काढण्यासाठी मदत करणे हे खरे मूलभूत उपाय आहेत. मोदींनी त्यावर बोलायला हवे. पण मोदी सरकारचे नवीन शैक्षणिक धोरण म्हणजे त्यात गोमूत्रावर संशोधन करणे आणि वेदांचे पाठांतर करणे हे आहे. विविध प्रकारचे आर्थिक वा राजकीय विचार यांची त्यांना भीती वाटते. कालच्या भाषणातला दिमागी नक्षलवादाचा नायनाट करा हा मोदींचा विचार त्याचेच उदाहरण आहे. हिंदुत्ववादाच्या विरोधात, गरिबांच्या बाजूने बोलणारा कोणी असेल की त्याला नक्षलवादी ठरवायचे हा मोदी सरकारचा खाक्या आहे. तरुणांना सर्व प्रकारचा विचार करण्याचे स्वातंत्र्य हवे. ते केवळ तंत्रज्ञानामध्ये नव्हे तर राजकीय व सामाजिक क्षेत्रातही लागू आहे. पण मोदींना हे मान्य नाही. जंतरमंतरवर तरुणांच्या संतापाचा जो स्फोट झाला त्याने खरे तर मोदींनी आत्मपरीक्षण करायला हवे होते. पण ते घडलेले नाही. उलट तिथल्या काही तरुणांवर नक्षलवादी असल्याचा शिक्का मारला की आंदोलनामध्ये फूट पडेल अशा कल्पनेत ते वावरत आहेत. जंतरमंतरवर जमलेल्यांमध्ये सर्व जण राज्यघटनेची, शांततेने आंदोलन करण्याची भाषा बोलत होते. त्यापैकी कोणीही या देशाचे सरकार उलथून टाकू वगैरे भाषा केली नाही. उलट ते मोदी सरकारकडे हक्काने काही गोष्टी मागत होते. मोदी आता त्याचा विपर्यास करून त्यांच्यावर नक्षलवादी हा शिक्का मारू पाहत आहेत. स्वातंत्र्यदिनी देशाला एकत्र घेऊन जाण्याची भाषा करण्याऐवजी असले शिक्के मारण्याचे व फूट पाडण्याचे राजकारण केले जावे हे दुर्दवाचे आहे.

## विचार

# रुपयाची घसरगुंडी थांबेल का?

**_भारतीय रुपयाचा डॉलरच्या तुलनेत सातत्याने होणारा अवमूल्यनाचा प्रवास पुन्हा एकदा चिंतेचा विषय ठरत आहे. रुपया ९५ रुपयांच्या पुढे घसरल्यानंतर अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांवर त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. चलनाची सातत्याने होणारी घसरण ही कोणत्याही विकसनशील देशासाठी धोक्याची घंटा मानली जाते. कारण चलन त्या देशाच्या आर्थिक सामर्थ्याचे, गुंतवणूकदारांच्या विश्वासाचे आणि वित्तीय स्थैर्याचे प्रतीक असते._**

**हेमंत देसाई**




भारतीय अर्थव्यवस्था गेल्या काही वर्षांमध्ये वेगाने वाढत आहे. भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. उत्पादन, सेवा, तंत्रज्ञान आणि डिजिटल व्यवहारांमध्ये भारताने मोठी झेप घेतली आहे; परंतु या सकारात्मक चित्राला रुपयाच्या घसरणीने काहीसे ग्रहण लागले आहे. प्रश्न केवळ रुपया घसरला याचा नाही, तर ही घसरण किती काळ सुरू राहणार आणि तिचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर किती व्यापक परिणाम होणार, हा आहे. रुपया का घसरतो, याची अनेक कारणे आहेत. सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे अमेरिकन डॉलरची जागतिक ताकद. अमेरिकेची मध्यवर्ती बँक 'फेडरल रिझर्व्ह' व्याजदर वाढवते, तेव्हा जागतिक गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीसाठी अमेरिकेकडे वळतात. त्यामुळे डॉलरची मागणी वाढते आणि रुपयासह अनेक देशांच्या चलनांवर दबाव निर्माण होतो. दुसरीकडे भारतासारखा देश मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, संरक्षण साहित्य, यंत्रसामग्री आणि औद्योगिक कच्चा माल आयात करतो. या आयातीसाठी डॉलरची आवश्यकता असते. डॉलरची मागणी वाढली, की रुपयाचे मूल्य आपोआप कमी होते. रुपयाच्या घसरणीचा पहिला आणि सर्वाधिक परिणाम आयातीवर होतो. भारत आपल्या गरजेच्या जवळपास ८५ टक्के कच्च्या तेलाची आयात करतो. डॉलर महाग झाला, की त्याच प्रमाणातील तेलासाठी अधिक रुपये मोजावे लागतात. परिणामी पेट्रोल, डिझेल, एलपीजी, विमान इंधन आणि औद्योगिक इंधनाच्या किंमती वाढण्याची शक्यता निर्माण होते. इंधन महागले, की वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम अन्नधान्यापासून बांधकाम साहित्यापर्यंत सर्व वस्तूंच्या किमतींवर होतो. महागाईचे चक्र वेगाने फिरू लागते.

डॉलर महागल्यामुळे औद्योगिक उत्पादनासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्री, इलेक्ट्रॉनिक चिप्स, वैद्यकीय उपकरणे आणि रासायनिक कच्च्या मालाच्या आयातीचाही खर्च वाढतो. त्यामुळे उद्योगांचे उत्पादन खर्च वाढतात. उत्पादन खर्च वाढला, की कंपन्या तो भार ग्राहकांवर टाकतात. परिणामी, सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त ताण पडतो. अमेरिकेने अलिकडे इराणवर सलग १३ दिवस हल्ले केल्यानंतर किंचित विराम घेतला आहे. इराणनेही शेजारील आखाती देशांवरील हल्ले स्थगित केले आहेत. युद्धाची वाढणारी व्याप्ती, संरक्षण सामग्रीचा घटणारा साठा, विस्कळित ऊर्जापुरवठा आणि अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे. त्यामुळे जागतिक बाजारपेठेमध्ये कच्च्या तेलाच्या दरात पाच टक्क्यांची घट होऊन ते ९१ डॉलर प्रति बॅरल दरापर्यंत पोहोचले आहे. जगातील सर्वाधिक म हत्त्वाच्या तेलमार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक लवकरच पूर्ववत होण्यास सुरुवात होईल. भारतात २५ मेपासून पेट्रोल व डिझेलचे दर स्थिर आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर, झपाट्याने विस्तारणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता परिसंस्थेला बळकट करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट कंपनी भारतात १७.५ अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार असल्याची कंपनीचे मुख्याधिकारी सत्या नाडेला यांनी केलेली घोषणा महत्वाची आहे. २०३५ पर्यंत देशातील म्युच्युअल फंडांची गंगाजळी ३०० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. असे असूनदेखील भारताच्या रुपयाची सतत घसरगुंडी होत असून, एका डॉलरला ९६ रुपयाची सीमारेषा त्याने पार केली आहे.

या पार्श्वभूमीवर रुपयाची घसरगुंडी थांबल्यास एक प्रकारचा दिलासा मिळू शकेल. अर्थात शेअर बाजारात तेजी होती, तेव्हादेखील रुपया घसरत होता. परकीय चलनाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पुरवठ्यापेक्षा चलनाची मागणी जास्त होते, तेव्हा चलनाचा भाव वाढतो आणि मागणीच्या मानाने चलनाचा पुरवठा वाढतो, तेव्हा चलनाचा भाव कमी होतो. कुठलाही देश निर्यातीपेक्षा आयात जास्त करतो, तेव्हा त्याच्या चलनाचा भाव घसरत असतो. याचे कारण, निर्यात आणि आयात हे दोन्ही व्यवहार डॉलर या चलनात होत असल्यामुळे निर्यात करतेवेळी डॉलर्स मिळतात तर आयात करतेवेळी रुपया देऊन डॉलर्स विकत घेतले जातात आणि ते डॉलर्स देऊन परदेशातून वस्तू आणि सेवा या आयात करत असतो. त्यामुळे डॉलरचा भाव वाढतो आणि रुपयाचा घसरतो. वर्षानुवर्षे भारतात हेच चालत असल्यामुळे रुपयाचा भाव घसरत चालला आहे. एकीकडे भारतातील उद्योगधंद्यात परकीय भांडवल आकर्षित होत असले, तरी परदेशी अर्थसंस्थांनी भारतीय शेअर बाजारात गुंतवलेला पैसा काढून घ्यायला सुरुवात केलेलीच आहे. कारण त्यांना भारतापेक्षा अमेरिकेत वा अन्यत्र अधिक परतावा मिळत आहे. परदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारात समभाग विकत घेतो, तेव्हा तो डॉलर्स देत असतो. याउलट ते समभाग विकतात, तेव्हा मिळालेल्या रुपयांचे डॉलर खरेदी करतात आणि परदेशी नेतात. त्यामुळे डॉलरची मागणी वाढते आणि रुपयाच्या तुलनेत डॉलरचा भाव वाढतो. म्हणजेच अशा वेळी रुपया घसरत असतो आणि हेच गेले काही महिने सुरू आहे.

१९७५ मध्ये एक डॉलर विकत घेण्यासाठी ४१ रुपये मोजावे लागत होते. २००० मध्ये त्यासाठी ४५ रुपये मोजावे लागू लागली. २०१२ मध्ये डॉलरचा दर ५३ रुपयांवर जाऊन पोहोचला. १९६५ चे भारत-पाकिस्तान युद्ध तसेच दुष्काळी परिस्थिती यामुळे १९६६ अखेर भारत सरकारला प्रथमच रुपयाच्या अवमूल्यनाचा निर्णय घ्यावा लागला होता. रुपयाचे तब्बल ५७ टक्के अवमूल्यन करावे लागले. त्यामुळे ६ जून १९६६ पर्यंत एका डॉलरची किंमत ४.७६ रुपये इतकी होती. अवमूल्यन केल्यानंतर ती ७.५० रुपये इतकी झाली. डॉ. मनमोहन सिंग अर्थमंत्री असताना, जुलै १९९१ मध्ये रुपयाचे १९ टक्क्यांनी अवमूल्यन करण्यात आले. सध्या मात्र रुपयाने डॉलरपुढे नांगी टाकली आहे. त्याचे प्रमुख कारण स्थानिक चलन, म्हणजेच रुपयापेक्षा अमेरिकन चलनाला जागतिक बाजारात असलेली वाढती मागणी, हे आहे. आज संपूर्ण जगाची वाटचाल बहुध्रुवीय रचनेकडे होत असल्याचा दावा केला जात असला, तरी अजूनही अमेरिकन डॉलर हेच सर्वात प्रभावी चलन आहे. डॉलरला पर्यायी चलन निर्माण करण्यात अद्याप यश मिळालेले नाही. त्यामुळेच अजूनही डॉलरच्या तुलनेत एखाद्या चलनाचे मूल्य काय आहे, यावरून त्या देशाची पत ठरते. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हच्या धोरणांमुळे अमेरिकन रोखे हे गुंतवणुकीवर अधिक लाभ मिळवून देत आहेत. परिणामी, डॉलर मजबूत होत आहे. म्हणूनच परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारातून अलीकडील काळात १७ अब्ज डॉलर काढून घेतले आहेत. दुसरीकडे बँकांकडून वाढीव दराने डॉलरची खरेदी सुरू होती. त्यातच अमेरिकेने भारतासह अनेक देशांवर चढे आयात शुल्क लादल्यामुळे परिस्थिती चिघळली.

मुळातच अब्जावधी डॉलरची व्यापारतूट हा पूर्वीपासून भारतासमोरील काळजीचा विषय बनला आहे. एकीकडे सोने आणि तेलाची प्रचंड आयात आणि दुसरीकडे घटती निर्यात, अशी स्थिती आहे. आत्मनिर्भर भारताची घोषणा देण्यात आली असली, तरी चीन आणि अमेरिकेतून भारत मोठ्या प्रमाणावर वस्तूंची आयात करतो. आयातपर्यायी उत्पादनालाही वेग आलेला नाही. रुपया घसरल्यामुळे पहिला फटका इंधन आयातीला बसतो. एकदा पेट्रोल महागले की, वाहतूक खर्च भडकतो आणि सर्वच वस्तूंचे भाव वाढतात. परदेशी शिक्षण आणि प्रवासावर अधिक खर्च करणे भाग पडते. परकीय कर्जाची परतफेड करतानाही जास्त बोजा पडतो. दुसरीकडे, निर्यातदार तसेच माहिती-तंत्रज्ञान उद्योगाला लाभ होतो. त्याचप्रमाणे अनिवासी भारतीयांना रुपयांमध्ये अधिक लाभ होतो. परंतु ही संख्या तुलनेने मूठभरच आहे. परकीय चलनाच्या विनिमय बाजारात फारसा हस्तक्षेप न करता फक्त अस्थिरता नियंत्रित करणे, हेच धोरण सध्या रिझर्व्ह बँकेतर्फे ठेवण्यात आले आहे. नैसर्गिकरीत्या बाजारात संतुलन साधले जावे, असे हे धोरण आहे. रिझर्व्ह बँकेने हस्तक्षेप केल्यास अर्थव्यवस्थेतील लिक्विडिटी किंवा तरलतेवर परिणाम होत असतो. त्यामुळे बाजारपेठेत ढवळाढवळ करण्यापेक्षा केंद्र सरकारने भारतीय वस्तूंची उत्पादकता वाढवण्यावर आणि निर्यातक्षमता सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

## चर्चा आजची

# राष्ट्रीय सणाची प्रतिष्ठा धुळीस!

**राकेश लोहार**

देशभरात शनिवारी भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन अभिमानाने साजरा झाला. चौकाचौकात तिरंगा डौलाने फडकला, देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारावून गेले आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाला अभिवादन करण्यात आले. मात्र, याच दिवशी रायगड जिल्ह्यातून समोर आलेल्या दोन घटनांनी प्रशासनाच्या कारभाराची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करताना आपण नेमके कोणत्या भारताचा जयघोष करीत आहोत, असा संतप्त सवाल या घटनांमुळे उपस्थित झाला आहे.

स्वातंत्र्य आपल्याला फुकट मिळालेले नाही. या स्वातंत्र्यासाठी असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी आपली घरे, संसार, सुख आणि अखेर प्राणही पणाला लावले. अनेकांनी हसत-हसत फासाचा दोर स्वीकारला. त्या बलिदानाच्या स्मृती जाग्या ठेवण्यासाठी आपण दरवर्षी १५ ऑगस्ट साजरा करतो. मग याच दिवशी प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे राष्ट्रीय सणाची प्रतिष्ठाच धुळीस मिळत असेल, तर यापेक्षा दुर्दैवी चित्र कोणते?

अलिबाग तालुक्यातील धाकटे शहापूर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनी गुडघाभर पाण्यात उभे राहून ध्वजारोहण करावे लागल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. शाळेच्या परिसरात पावसाचे पाणी साचत असल्याने विद्यार्थ्यांना चिखल आणि पाण्यातून मार्ग काढावा लागत असल्याचे सांगण्यात आले आहे. राष्ट्रीय सणाच्या दिवशी तिरंग्याला सलाम करण्यासाठी आलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांची अशी अवस्था असेल, तर शिक्षण विभाग आणि स्थानिक प्रशासन नेमके करीत काय आहे, हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. कारण, स्वातंत्र्य दिन अचानक आलेला नाही, याची जाणीव प्रशासनाला नसावी, याहून शरमेची बाब कोणती? या दिवसासाठी योग्य व्यवस्थापन प्रशासनाने ठरवले असते, तर करता आली असती. परंतु, तेवढे कष्ट संबंधित प्रशासनाने घेतले नाहीत. ते का घेतले नाहीत, याचा जाब विचारुन जबाबदारांवर कारवाई होणे गरजेचे आहे.

कारण, ही केवळ पाणी साचण्याची समस्या नाही. ही प्रशासनाच्या संवेदनशीलतेची परीक्षा आहे. वर्षानुवर्षे शाळा, रस्ते, नाले, पाणी निचरा अशा मूलभूत प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी यंत्रणा अस्तित्वात आहे. निधी आहे, अधिकारी आहेत, लोकप्रतिनिधी आहेत; मग प्रश्न सुटत का नाहीत? पावसाचे पाणी शाळेच्या आवारात साचते आणि त्याचा कायमस्वरूपी निचरा करण्यासाठी मात्र वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागते, हे कोणत्या विकासाचे लक्षण आहे?



याच दिवशी कुरकुंडी-कोलटेंभी ग्रामपंचायतीत स्वातंत्र्यदिनाचा राष्ट्रीय कार्यक्रम नियमानुसार पार पडला नसल्याची आणखी एक तक्रार पंचायत समिती प्रशासनाकडे करण्यात आली आहे. ही घटना गंभीर आहे. त्यामुळे या तक्रारीची सखोल चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात ग्रामपंचायतीचे ठराव, आदेश, उपस्थिती नोंद, ध्वजारोहणाची नोंद, उपलब्ध छायाचित्रे-चित्रफिती तसेच कार्यक्रमावरील खर्चाची बिले व देयके तपासण्याची गरज आहे.

या दोन्ही प्रकरणांत प्रशासनाने निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करणे आवश्यक आहे. मात्र, चौकशी होण्यापूर्वीच जर प्रशासनाने या तक्रारींकडे नेहमीच्या कागदोपत्री पद्धतीने पाहिले, तर त्यातून प्रश्न सुटणार नाहीत. उलट, जनतेचा प्रशासनावरील विश्वास अधिकच ढासळेल. रायगडमध्ये प्रशासनावर वचक ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते लोकप्रतिनिधी मात्र जनतेच्या प्रश्नांपेक्षा पद, सत्ता आणि खुर्चीची गणिते जुळवण्यात अधिक रमले आहेत, अशी भावना जनतेत निर्माण होत असेल तर ती गंभीर बाब आहे. कोणाला कोणते पद मिळणार, कोणाच्या वाट्याला कोणती खुर्ची येणार, कोणाची सत्ता वाढणार, याची स्वप्ने पाहण्यात जर राजकारण गुंतले असेल, तर शाळेच्या आवारात साचलेले पाणी आणि ग्रामपंचायतीतील राष्ट्रीय कार्यक्रमाचा प्रश्न कोण सोडवणार?

स्वातंत्र्यदिनी गुडघाभर पाण्यात उभे असलेले विद्यार्थी आणि राष्ट्रीय कार्यक्रमाबाबत झालेली तक्रार हे रायगडच्या विकासाच्या आरशातील दोन बोचरे प्रतिबिंब आहेत. या घटनांकडे केवळ दोन स्वतंत्र तक्रारी म्हणून न पाहता प्रशासनाच्या कार्यक्षमतेची कसोटी म्हणून पाहण्याची गरज आहे. आणि, ज्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडली नाही, त्यांच्यावर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. परंतु, इथे एक प्रश्न उपस्थित होतोय, तो म्हणजे, तक्रारीवर कारवाई करणार कोण?

तिरंगा केवळ ध्वजस्तंभावर फडकवून देशभक्ती सिद्ध होत नाही. त्या तिरंग्याखाली उभ्या असलेल्या प्रत्येक नागरिकाला सन्मान, सुरक्षितता आणि मूलभूत सुविधा मिळतील, याची काळजी घेणे हीच खरी देशसेवा आहे. स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाची शपथ घेऊनही जर प्रशासनाला चिमुकल्या विद्यार्थ्यांना गुडघाभर पाण्यात उभे असल्याचे चित्र दिसत नसेल, स्वातंत्र्यदिनाचा राष्ट्रीय कार्यक्रम नियमानुसार पार पडलाच नसेल, तर स्वातंत्र्यदिन साजरा करण्याच्या पद्धतीवरच आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. तिरंगा उंच फडकत राहावा; पण त्याच्या सावलीत प्रशासनाची मान मात्र जनतेसमोर खाली झुकता कामा नये! याची जबाबदारी प्रशासनाची पर्यायाने प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची आहे. परंतु, तेच कुठेतरी आपली जबाबदारी विसरलेत की काय, असा प्रश्न या दोन घटनांच्या निमित्ताने निर्माण झाला आहे.

## लोकसंसद

### आश्रमशाळांचा दर्जा सुधारण्याची गरज

गडचिरोलीत सर्पदंशाने तीन चिमुरड्या मुलींचा बळी जाणे आणि अमरावतीमध्ये भुताटकीच्या भीतीने विद्यार्थिनींचे मानसिक संतुलन बिघडणे, या घटना म्हणजे केवळ अपघात नसून प्रशासकीय हलगर्जीपणाचा नमुना म्हणावा लागेल. गडचिरोलीतील आश्रम शाळेत सापांचा सुळसुळाट असणे आणि सर्पदंशावर वेळेवर प्रथमोपचार न मिळणे म्हणजे प्रशासनाचा निष्काळजीपणा आणि ढिसाळ कारभार आहे. एकीकडे शिक्षणासाठी घराबाहेर पडलेल्या आदिवासींच्या मुलांना अशाप्रकारे थेट मृत्यूने गाठावे, यापेक्षा दुर्दैव ते कोणते? तर दुसरीकडे आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात अमरावतीतील शाळेत भुताटकीच्या अफवा पसरतात याला काय म्हणावे? आश्रमशाळांना कोट्यवधींचा निधी मिळूनही तेथे मूलभूत सुरक्षा आणि आरोग्य सुविधा का उपलब्ध नाहीत? वास्तविक आदिवासी आणि दुर्गम भागातील गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी सुरू करण्यात आलेल्या या आश्रमशाळा आज अनेक मूलभूत सुविधांअभावी स्वतःच उपेक्षित बनल्या आहेत. अनेक शाळांमध्ये पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय नाही, तर काही ठिकाणी मुला-मुलींसाठी पुरेशी आणि स्वच्छ स्वच्छतागृहे नाहीत. निकृष्ट दर्जाचे जेवण आणि राहण्याची अस्वच्छ जागा यामुळे येथील विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत आश्रम शाळांमधील अलीकडच्या या गंभीर घटनांची दखल घेऊन शासनाने या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी उचित पावले उचलण्याची गरज आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# सणांचा, व्रतवैकल्यांचा आणि चैतन्याचा महिना : श्रावण

श्रावण महिना सुरू झाला की वातावरणातच एक वेगळे चैतन्य निर्माण होते. हिंदू संस्कृतीत श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा महिना केवळ धार्मिक श्रद्धेचा नाही, तर निसर्ग, परंपरा, कुटुंब आणि सामाजिक एकोप्याचा सुंदर संगम घडवून आणणारा महिना आहे. त्यामुळेच श्रावणाला 'सणांचा महिना' आणि 'व्रतवैकल्यांचा महिना' असे म्हटले जाते.

श्रावणातील सोमवार विशेष पवित्र मानला जातो. या दिवशी भगवान शिवाची भक्तिभावाने पूजा केली जाते. अनेक भाविक उपवास, अभिषेक आणि विविध धार्मिक विधी करतात. श्रावणातील प्रत्येक दिवसाचेही धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. मंगळागौर, नागपंचमी, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, बैलपोळा अशा विविध सण-उत्सवांनी हा महिना अक्षरशः बहरून जातो. त्यानंतर येणाऱ्या गौरी-गणपतीच्या उत्सवाची चाहूलही श्रावणापासूनच लागते.

नागपंचमीपासून दसरा-दिवाळीपर्यंतच्या सणांची जणू सुरुवातच श्रावणातून होते. त्यामुळे घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. सणांच्या दिवशी गोडाधोडाचा बेत, नातेवाईकांच्या भेटीगाठी, पूजा-अर्चा आणि पारंपरिक कार्यक्रम यामुळे घरातील वातावरण आनंदाने भरून जाते. श्रावणातील प्रत्येक दिवस जणू उत्सवाचा अनुभव देतो.

श्रावणातील व्रतवैकल्यांमागे केवळ धार्मिक श्रद्धा नाही, तर मानसिक शिस्त, संयम आणि सकारात्मकतेचा संदेशही आहे. जीवनात सुख-दुःखाचे अनेक प्रसंग येत असतात. अशा वेळी श्रद्धा आणि आत्मविश्वास मनाला आधार देतात. सणांच्या निमित्ताने कुटुंबीय, मैत्रिणी आणि नातेवाईक एकत्र येतात. मनमोकळ्या गप्पा, हसणे-खेळणे आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, यामुळे नात्यांमध्येही आपलेपणा वाढतो. विशेषतः मंगळागौरसारख्या परंपरांमधून महिलांना एकत्र येण्याची, आनंद व्यक्त करण्याची आणि सामाजिक बंध दृढ करण्याची संधी मिळते. श्रावणाचे वैशिष्ट्य केवळ धार्मिक परंपरांपुरते मर्यादित नाही. या महिन्यात निसर्गही नव्या रूपात बहरलेला असतो. आषाढातील पावसाने धरती हिरवाईने नटलेली असते. डोंगर-दऱ्या, शेतांची बांधं, झाडं-वेली आणि माळरानावर हिरवाईची चादर पसरलेली दिसते. श्रावणाच्या रिमझिम सरी आणि क्षणाक्षणाला बदलणारे ऊन-पावसाचे वातावरण मनाला प्रसन्न करून जाते.

श्रावण हा विविध धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांना जोडणारा काळही आहे. भारतातील विविध समाजघटकांचे सण आणि उत्सव अनेकदा या कालखंडात किंवा त्याच्या आसपास येतात. त्यामुळे परंपरांचा सन्मान राखत परस्परांच्या सणांमध्ये आनंदाने सहभागी होणे, बंधुभाव वाढविणे आणि सामाजिक सलोखा जपणे ही आपल्या संस्कृतीची खरी ताकद आहे.

श्रावण म्हणजे भक्ती, पण केवळ कर्मकांड नव्हे; श्रावण म्हणजे निसर्ग, पण केवळ हिरवाई नव्हे; श्रावण म्हणजे सण, पण केवळ गोडाधोडा नव्हे. श्रावण म्हणजे मनाला प्रसन्न करणारे चैतन्य, नात्यांना घट्ट करणारा स्नेह आणि जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा!

निसर्गाच्या सान्निध्यात, परंपरांच्या सुगंधात आणि सणांच्या आनंदात मन चिंब भिजविणारा हा श्रावण प्रत्येकाच्या जीवनात सुख, समाधान, आरोग्य आणि आनंद घेऊन येवो, हीच सदिच्छा!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ ऑगस्ट

१) श्रीम.कविता गोपीनाथ जाधव किहीम, अलिबाग, १७-८-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



अनिकेत पाटणकर
वाढदिवस अलिबाग

स्मिता जिग्नेश शाह
साकेत सचिन जोशी, अलिबाग

# महाडला बकाल होऊ देणार नाही

- **सोनाली महाडीक यांची बेकायदेशीर नियुक्ती ही प्रशासनाची चूक !**
- **स्व. माणिकराव जगताप यांचे नाव सभागृहाला सन्मानाने देणार**

**। महाड । प्रतिनिधी ।**



महाड शहरात झालेले अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे, रस्त्यांची दुरावस्था, सुस्त प्रशासन यामुळे शहराला बकाल स्वरूप प्राप्त होत असल्याचा आरोप महाड नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये विद्यमान उपनगराध्यक्ष संदीप जाधव व नगरसेवकांनी प्रश्नोत्तराचे तासात उपस्थित केल्यानंतर महाड शहराला कोणत्याही परिस्थितीत बकाल होऊ देणार नाही.

सुरूवातीच्या प्रश्नोत्तराचे तासात उपनगराध्यक्ष संदीप जाधव, हेमंत चांदलेकर यांनी लाड समितीच्या शिफारसी नुसार करण्यात आलेली सोनाली महाडीक उर्फ सोनाली सुर्यवंशी यांची बेकायदेशीर नियुक्ती ही प्रशासनाकडून करण्यात आलेली मोठी चूक आहे, कुठल्याही प्रकारची चौकशी न करता ही नियुक्ती करण्यात आली असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर या नियुक्तीला स्थगिती देण्यात आली असून संबंधितांना मुळ कागदपत्र सादर करण्यास सांगितले आहे. त्यात जर ही नियुक्ती बेकायदेशीर असल्याचे आढळून आले तर ती नियुक्ती रद्द करून त्यात दोषी असलेल्यांवर कारवाई करण्याचे संकेत नगराध्यक्ष कविस्कर यांनी दिले.

यावेळी ३१ जुलै रोजी सदरच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात येत असल्याचे मुख्याधिकाऱ्यांनी यांचे पत्र मी स्वतः पाहिले होते, मात्र त्याच रात्री हे पत्र कुणाच्या दबावामुळे त्याच जावक नंबरवर बदलले गेले हे देखील संदीप जाधव यांनी निदर्शनास आणून दिले. यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकारी प्रियांका घनवट ह्या घरी जात असताना कोलाडवरून त्यांना परत फिरावे लागले. यावेळी त्यांच्यावर आलेल्या राजकीय दबावामुळे रात्री सोनाली महाडीक उर्फ सुर्यवंशी यांना अगोदरचे पत्र बदलून द्यावे लागले. राजकीय दबावामुळे असे निर्णय होत असल्यानेच प्रशासन अडचणीत आले असल्याचा आरोप संदीप जाधव यांनी यावेळी केला.

कामाची मुदत संपलेल्या ठेकेदाराला खोटी मुदतवाढ दिल्याचा ठराव नोंदवून कुठलीही मुदतवाढ न देता बेकायदेशीरपणे तुरटी आणि टिसीएल पावडर खरेदी करण्याची वर्कऑर्डर आरोग्य विभागाने दिल्याची गंभीर बाबही यावेळी संदीप जाधव यांनी निदर्शनास आणून दिली.

महाड गांधारी पूल ते महामार्गापर्यंतचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे झाले असून या कामावर प्रशासनाचे नियंत्रण नाही. ठरलेल्या अटी व शर्तीनुसार हे काम केले गेले नाहीत त्याचे पुरावे आपल्याकडे आहेत असे नगरसेवक हेमंत चांदलेकर यांनी आणून देत या कामाची चौकशी करून त्याचे बिल अदा करू नये अशी मागणी केली त्यावर जोवर या रस्त्याचे काम दर्जेदार व योग्य रितीने होत नाही तोवर या रस्त्याचा ताबा घेतला जाणार नाही असे नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांनी स्पष्ट केले.

महाड नगर परिषदेच्या शाळा नं. ५ च्या इमारतीमध्ये रायगड शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज व शाळा सुरू असून त्या बाबतचा कोणताही करार, त्याला मुदतवाढ घेण्यात आली नाही असे नगरसेवक ॲड. जाधव यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर या कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यामुळे यावर्षी कोणतीही कारवाई न करता पुढील वर्षी या संस्थेला कायदेशीर नोटीस बजावून या शाळा इमारतीतून बाहेर पडा अशी समज द्या, असे आदेश नगराध्यक्ष कविस्कर यांनी दिले.

# लोकमान्य ज्ञानदीप विद्या मंदिराचा नामांतर सोहळा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**



साई पंचक्रोशीतील हि शिक्षण संस्था नव्या पिढीसाठी आवश्यक असणाऱ्या नवनवीन अत्याधुनिक पद्धतीच्या शिक्षण प्रणालीच्या रूपाने येणाऱ्या काळात नावारूपाला येईल असे प्रतिपादन खा.सुनील तटकरे यांनी साई येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

साई पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित लोकमान्य ज्ञानदीप विद्या मंदिर साई शाळेचे नामांतर श्री.सुनील दत्तात्रेय तटकरे असा नामांतर अनावरण सोहळा व विद्यालयाच्या नवीन इमारतीचा उद्घाटन सोहळा वर्धापन दिनाचे औचित्य साधून खा.सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सेवानिवृत्त शिक्षक सदानंद मेहंदळे व वरदा सुनील तटकरे यांच्याहस्ते व मंत्री आदिती तटकरे, आ.अनिकेत तटकरे, सेवानिवृत्त शिक्षक ललित गुजर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास राजिपचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, रायगड लोकसभा अध्यक्ष स्नेहल जगताप, राष्ट्रवादीचे नेते शेखर देशमुख, महंमद मेमन, हनुमंत जगताप, गजानन अधिकारी, जिल्हा राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, ज्येष्ठ नेते महादेव बक्कम, नाना भौड, जिल्हा परिषद सदस्य अस्लम राऊत, सदस्या दिशा जाधव, प्रदेश युवक सचिव दीपक जाधव, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काका नवगणे, उपसभापती मनीषा मालोरे, जिल्हा युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष शादाब गैबी, हुसेन रहाटविलकर, शैलेश भोनकर, युवानेते तथा ठेकेदार सिद्धांत देसाई, पंचायत समिती सदस्य संगीता बक्कम, अलका केकाणे, नाझीम हसवारे, चंद्रकांत रोडे, ॲड. उत्तम जाधव, राजेंद्र शिर्के, ॲड. सुशील दसवते, सरपंच शौकत रोहेकर, दिनेश गुगले, संदेश मालोरे, उदय अधिकारी, संतोष खडतर, जलील फिरफिरे आदींसह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, साई पंचक्रोशीतील तसेच मोर्बा विभागातील नागरिक संस्थेचे सर्व संचालक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी खा.सुनील तटकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## १२ वर्षानंतर आरोपीला बेड्या

**पनवेल :** एका गंभीर फसवणूक प्रकरणात अटकेनंतर जामिनावर सुटून तब्बल १२ ते १३ वर्षांपासून पोलिसांना हुलकावणी देणाऱ्या फरार आरोपीला कळंबोली पोलिसांनी अखेर बेड्या ठोकल्या आहेत.

मोबाईल लोकेशन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अचूक वापर करून पोलिसांनी तळोजा परिसरातून या आरोपीला जेरबंद केले. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. रूपेश कालगुडे याने सहा लाख ७० हजारांची फसवणूक केली होती. याप्रकरणी कळंबोली ठाण्यात गुन्हा दाखल होता.

## पिरकोनच्या विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती परीक्षेत उंच भरारी

**। उरण । प्रतिनिधी ।**

रयत शिक्षण संस्थेच्या पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोन या शाळेने शैक्षणिक क्षेत्रात आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. शाळेचा गुणवंत विद्यार्थी विधेश सदाशिव जोशी याने उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २३८ गुण मिळवून उरण तालुक्यात प्रथम क्रमांक व रायगडातील गुणवत्ता यादीत सातवा क्रमांक पटकवून त्याने बहुमान मिळविलेला आहे.

त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, शाळेचा नावलौकिक उंचावला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या वतीने विधेशचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्याच्या या यशामध्ये त्याचे पालक, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद आणि शाळेचे मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा आहे.

# शिवतांडव पथकाचा वर्धापन दिन साजरा

**। महाड । प्रतिनिधी ।**



महाडमधील पहिले ढोल-ताशा पथक म्हणून ओळख असलेल्या शिवतांडव ढोल ताशा पथकाचा १३वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने पथकातील वादकांचा गुणगौरव तसेच सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला नवयुग विद्यापीठाचे अध्यक्ष रणजितसिंह जाधवराव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी त्यांनी पथकातील सर्व वादक व सदस्यांना मार्गदर्शन करताना सांघिक भावना, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित केले.

वर्धापन दिनाचे औचित्य साधून शिवतांडव ढोल ताशा पथकातील वादकांनी वृक्षारोपणाचा उपक्रम राबविला. केवळ वृक्षारोपण करून न थांबता वर्षभर या झाडांची निगा राखून त्यांच्या वाढीची काळजी घेण्याचा संकल्प पथकातील सदस्यांनी केला. सामाजिक बांधिलकी जपत राबविलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

दरम्यान, २०२६-२७ या वर्षासाठी पथकाच्या नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी कल्पेश पाटील, विवेक ठोंबरे, विशाल सावंत, तर सिद्धेश वडके यांची निवड करण्यात आली.

गेल्या १३ वर्षांपासून महाडच्या सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये आपल्या दमदार वादनाने वेगळी ओळख निर्माण करणारे शिवतांडव ढोल ताशा पथक आता आगामी गणेशोत्सवासाठी सज्ज झाले आहे. गणेशोत्सवात वादनरूपी सेवा देण्यासाठी पथकातील सर्व वादक जोमाने सराव करत असून, यंदाच्या गणेशोत्सवात आपल्या वादनातून जल्लोष निर्माण करण्यासाठी वादकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

## राडारोडा पडून महिला जखमी

**पनवेल :** कोनगाव येथे बांधकाम सुरू असलेल्या इमारतीला लावलेली सुरक्षा जाळी अचानक तुटल्याने त्यात साचलेला राडारोडा खाली काम करत असलेल्या महिला काम गाराच्या अंगावर कोसळला. या दुर्घटनेत विनंती सिंग या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी कंपनीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# पथदिव्यांच्या माध्यमातून गोवे गावाला उजेडाची भेट

- **संदीप तटकरे यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण**

**। कोलाड । प्रतिनिधी ।**



तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संदीप तटकरे यांच्या माध्यमातून श्रीमती गीता द. तटकरे तंत्रनिकेतन कॉलेजच्या वतीने पर्यावरणपूरक ऊर्जेचा प्रसार व्हावा तसेच ग्रामीण भागात शाश्वत विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने गोवे ग्रामपंचायतीला शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी सौर पथदिव्यांची भेट देण्यात आली.

या उपक्रमांतर्गत ग्रामपंचायत परिसरासाठी सौर दिवे व पाईप प्रदान करण्यात आले. यावेळी नामफलकाचे अनावरण तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संदीप तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाला गोवे ग्राम पंचायतीचे सरपंच महेंद्र पोटफोडे, नरेंद्र जाधव, नरेंद्र पवार, ग्राम सेवक गोविंद शिद, गोवे गावकी अध्यक्ष राजेश शिर्के, निशा जवके, अजित तेलंगे, प्राचार्य विपुल मसाल, प्राचार्य विश्वास देशमुख, प्रवीण पवार, राकेश कापसे, लहू पिपलकर, साई कापसे, नितीन जाधव, किरण पवार, विनायक पोटफोडे, विनायक जवके, गणेश दिघे, अनिल पवार, नितीन जवके, निलेश कोंजे, बळीराम जाधव, राजेंद्र जाधव निलेश जाधव, कुणाल पवार, नयन जाधव, भरत जाधव, राकेश जाधव विजय जाधव शिवशंभू मंडळ गोवेचे सदस्य, गावातील युवक तसेच ग्रामपंचायतमधील अश्विनी पोटफोडे, मयुरी जाधव आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

सौर ऊर्जेच्या वापरामुळे वीज बचत होऊन पर्यावरणाचे संरक्षण होण्यास मदत होईल, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. तसेच या सौर पथदिव्यांमुळे गोवे परिसरातील रस्त्यांवर रात्रीच्या वेळी सुरक्षितता वाढण्यास मदत होणार असून नागरिकांनाही त्याचा लाभ मिळणार आहे. तटकरे कॉलेजच्या या सामाजिक उपक्रमाचे गोवे ग्रामपंचायतीच्या वतीने कौतुक करण्यात आले.

**निधी वितरणास शासनाची मान्यता | विशेष वाढीव दराने मिळणार मदत**

# रायगडातील आपत्तीग्रस्तांना दिलासा

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुका व नागोठणे परिसरातील अतिवृष्टीग्रस्त दुकानदार व टपरीधारकांना त्यांच्या व्यावसायिक नुकसानीपोटी विशेष वाढीव दराने आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासोबतच राज्यातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना कपडे, घरगुती भांडी व वस्तूंच्या नुकसानीसाठीही विशेष वाढीव दराने मदत मिळणार आहे.

रोहा व नागोठणे परिसरासह रायगड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे दुकाने आणि टपऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. अनेक छोट्या व्यावसायिकांचे व्यवसायाचे साहित्य, मालमत्ता तसेच दुकानांच्या संरचनेचे नुकसान झाले. नैसर्गिक आपत्तीचा फटका बसलेल्या या दुकानदार व टपरीधारकांना केवळ नियमित मदतीपुरते मर्यादित न ठेवता विशेष वाढीव दराने मदत मिळावी, यासाठी मंत्री आदिती तटकरे यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला.

याच अनुषंगाने दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मंत्रालयातील मंत्री आदिती तटकरे यांच्या दालनात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत रायगड जिल्ह्यातील घरे, दुकाने, शेती, पशुधन तसेच इतर मालमत्तेच्या नुकसानीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विशेषतः नागोठणे व रोहा परिसरातील नुकसानग्रस्त दुकानदार व टपरीधारकांना नुकसानभरपाई तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

नुकसानग्रस्त दुकानांचे पंचनामे पूर्ण झाले असून, दुकानांच्या नुकसानीसाठीचा प्रस्ताव विभागीय स्तरावरून शासनाकडे तातडीने सादर करण्याच्या सूचना विभागीय स्तर व रायगड जिल्हा प्रशासनाला देण्यात आल्या होत्या. त्या निर्देशानुसार तयार करण्यात आलेल्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने संमती दिली आहे.

नैसर्गिक आपत्तीग्रस्त कुटुंबांच्या कपडे तसेच घरगुती भांडी व वस्तूंच्या नुकसानीसाठी लेखाशीर्ष अंतर्गत निधी वितरणास मान्यता देण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना उणे प्राधिकरण पत्रावर कोषागारातून निधी वितरीत करता येणार असून, संबंधित अधिकाऱ्यांनी पंचनामे झाले असल्याची खातरजमा करूनच निधीचे वितरण करावे, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे रायगड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त दुकानदार आणि टपरीधारकांना त्यांच्या व्यवसायाशी संबंधित नुकसानीसाठी विशेषवाढीव दराने आर्थिक मदत मिळणार आहे. त्यामुळे अतिवृष्टीमुळे व्यवसायावर आलेल्या संकटातून सावरण्यासाठी छोट्या व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

शेती, पशुधन, घरे, दुकाने, टपऱ्या तसेच इतर व्यावसायिक आस्थापनांच्या नुकसानीची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढून आपत्तीग्रस्तांना त्वरित दिलासा मिळावा, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहेत.

## निवडक



### पडसरे येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात

**पाली :** अनुदानित आश्रमशाळा पडसरे येथे ८० वा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात तिरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करून थाटामाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला शिवछत्रपती पुरस्कार विजेते कराटे चॅम्पियन चंद्रशेखर शेट्टी, कराटे प्रशिक्षक अमर यादव, गावातील प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ नागरिक, शिक्षणप्रेमी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर भाषणे सादर केली. अनिल साजेकर यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेले शिस्तबद्ध कवायत प्रकार आणि प्रभावी संचलन उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारे ठरले. यासोबतच, कराटे प्रशिक्षक अमर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या थरारक कराटे प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. कार्यक्रमादरम्यान शिक्षिका दीपाली घरट आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी ढोपे यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व पटवून देत मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात माध्यमिक मुख्याध्यापक संदीप शिंदे यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. भारताच्या उज्ज्वल भविष्यात आणि देशाच्या विकासात शिक्षण आणि विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणात केले.



### विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**पाली :** जागृती शिक्षण प्रसारक मंडळ, पेडली येथे १५ ऑगस्टचे औचित्य साधून जनसेवा जनजागृती सामाजिक संस्था, खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत शाळेतील गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना मोफत वह्या आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. स्वातंत्र्याचा सण साजरा करत असताना शिक्षणाचा दिवा घरोघरी पोहोचावा, या उद्देशाने राबवण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आणि देशभक्तीची खरी जाणीव करून देणारा ठरला. कार्यक्रमाचे आयोजन जनसेवा जनजागृती सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व संस्थापक प्रथमेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे खजिनदार रोहन दळवी, सचिव मोनिका क्षीरसागर, सदस्य रोहित क्षीरसागर आणि विजय चव्हाण यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत सामाजिक बांधिलकी जपणे हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे मत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.



### सुवर्णक्रांती अर्बनचा वर्धापनदिन साजरा

**माणगाव :** सहकार क्षेत्रातील सुवर्णक्रांती अर्बन मल्टिस्टेट निधी लिमिटेड शाखा माणगाव या शाखेचा तृतीय वर्धापनदीन सोहळा १५ ऑगस्ट रोजी संस्थेचे संस्थापक एस. एम. म्हात्रे, संचालक शीतल पंडागळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थापक सुखदेव म्हात्रे यांच्याहस्ते माणगाव शाखेच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त केक कापण्यात आला. या वर्धापन दीन सोहळ्यात संस्थेचे सर्व शाखाधिकारी तसेच संस्थेच्या उन्नतीसाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवरांचे संस्थतर्फे संस्थापक एस.एम. म्हात्रे, संचालक शीतल पंडागळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. सदर सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या कामकाजाची माहिती देऊन संस्थेच्या भरभराटीस सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून ऋण व आभार व्यक्त केले. यावेळी संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या सोहळ्याचे प्रास्ताविक संस्थेचे माणगाव शाखाधिकारी राकेश पडवळ यांनी केले. या सोहळ्यास संस्थेचे मोर्बा प्रमुख संदीप सकपाळ, अन्वी कदम, अमोघ कदम, सुनील भोईर विकास शिंदे, संदीप वाकले, राजेश काठावले, कुलदीप पवार, सुदाम कानावडे, राम म्हात्रे, शोभा म्हात्रे, ज्योत्स्ना म्हात्रे, संगीता चव्हाण, राहुल देवळेकर, अक्षता मोरे, पूजा शिर्के , भक्ती नागावकर, प्राची महाडिक, उत्कर्षा पिलणकर, सुरेश पोटले, मधुमती नाईक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रेस्क्यू टीमचा स्वातंत्र्यदिनी सत्कार

**पाली :** सेवा हीच खरी मानवता या उक्तीचा प्रत्यय देत मुसळधार अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीत आपल्या प्राणाची पर्वा न करता देवदूतासारखे धावून आलेल्या ‌‌ॠसॅम मित्र मंडळफ आणि ॠवीर वीरेश्वर रेस्क्यू टीमफ यांच्या अलौकिक कार्याची दखल घेण्यात आली आहे.



पूरपरिस्थितीमध्ये स्वतःचा जीव धोक्यात घालून माणसांबरोबरच अनेक मुक्या जनावरांचे प्राण वाचवणाऱ्या या पथकातील सदस्यांचा १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी तहसीलदार उत्तम कुंभार तसेच आपत्ती व्यवस्थापन कार्यालयातर्फे नुकताच विशेष सत्कार करण्यात आला. सुधागड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक सखल भागात पुराचे पाणी साचले होते. कित्येक नागरिक आणि जनावरे पुराच्या पाण्यात अडकून पडली होती. अशा अत्यंत बिकट व धोकादायक परिस्थितीत सॅम मित्र मंडळ आणि वीर वीरेश्वर रेस्क्यू टीमच्या शूर सदस्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जीवाची बाजी लावून त्यांनी केवळ माणसांना सुरक्षित स्थळी हलवले नाही, तर पुराच्या वेढ्यात अडकलेल्या अनेक मुक्या प्राण्यांनाही मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर काढले. या धाडसी आणि सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या कार्याचे कौतुक करत सदस्यांचे आभार मानले.

# वैजनाथ-गौळवाडी मार्गाची अवस्था बिकट

## लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील प्रसिद्ध श्रीक्षेत्र वैजनाथ ते गौळवाडी दरम्यानच्या मुख्य रस्त्याची सध्या अत्यंत दुरावस्था झाली असून, संपूर्ण रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. पावसामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने रस्त्याची नेमकी खोली लक्षात येत नसून वाहनचालकांसाठी हा मार्ग अधिकच धोकादायक बनला आहे.

श्रीक्षेत्र वैजनाथ हे कर्जत तालुक्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ असून, येथील शिवमंदिरात वर्षभर हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे वैजनाथकडे जाणारा हा रस्ता धार्मिकदृष्ट्या तसेच स्थानिक वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. मात्र, रस्त्याची झालेली दुरावस्था पाहता भाविकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल स्थानिक ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. लोकप्रतिनिधी आणि संबंधित शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने दुरुस्तीचे काम हाती घ्यावे. अन्यथा एखादी गंभीर दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

### अपघाताची शक्यता; प्रशासन जागे होणार कधी?

रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना विशेष धोका निर्माण झाला आहे. पावसाच्या पाण्याखाली खड्डे दिसत नसल्याने वाहनांचे संतुलन बिघडण्याची शक्यता आहे. रात्रीच्या वेळी तर परिस्थिती आणखी गंभीर होत असून, योग्य प्रकाशव्यवस्था नसल्याने खड्ड्यांचा अंदाज घेणे वाहनचालकांना कठीण जाते.



### तातडीने खड्डे बुजविण्याची मागणी..

श्रीक्षेत्र वैजनाथ येथे येणारे भाविक, स्थानिक ग्रामस्थ, पादचारी, शाळकरी विद्यार्थी तसेच वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा विचार करून वैजनाथ-गौळवाडी मार्गावरील खड्डे तातडीने बुजवावेत आणि रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### शाळकरी विद्यार्थ्यांना सर्वाधिक त्रास...

या मार्गावरून परिसरातील अनेक गावांमधील शाळकरी विद्यार्थी दररोज पायी ये-जा करतात. रस्त्यावर मोठमोठे खड्डे आणि त्यामध्ये साचलेले पावसाचे पाणी यामुळे विद्यार्थ्यांना अत्यंत सावधपणे मार्गक्रमण करावे लागते. त्यातच एखादे वाहन खड्ड्यातून वेगाने गेल्यास साचलेल्या पाण्याचा आणि चिखलाचा फवारा थेट पादचारी तसेच विद्यार्थ्यांच्या अंगावर उडतो.यामुळे शाळेत जाताना विद्यार्थ्यांचे कपडे खराब होण्याबरोबरच त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच वाहनचालकाचा ताबा सुटल्यास किंवा पादचारी खड्डा चुकवताना घसरल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# माथेरानला जाणाऱ्या पर्यटकांची नेरळमध्ये गर्दी

## टॅक्सीऐवजी टेम्पो मध्ये बसून जाण्याची वेळ



| नेरळ | प्रतिनिधी |

दरवर्षी १५ऑगस्ट या दिवशी पर्यटक माथेरान मध्ये बहुसंख्येने येत असतात. यावर्षी शनिवारी स्वातंत्र्य दिन आल्याने सलग दोन दिवसांच्या सुट्टीमुळे पर्यटकांची तोबा गर्दी माथेरानमध्ये आहे. मात्र नेरळ स्थानकात सकाळी आलेले पर्यटक यांना टॅक्सीदेखील मिळेनाशी झाली आणि त्यामुळे पर्यटकांना मालवाहू टेम्पोमधून माथेरान जाण्याची वेळ आली होती.पर्यटकांची गर्दी दोन दिवस सुरू राहणार असून पर्यटकांचे मेगा हाल होणार आहेत.त्यामुळे नेरळ माथेरान घाट रस्त्यात वाहतूक कोंडी आणि वाहनांचे धोकादायक प्रवास सुरू राहणार आहेत.

माथेरान या पर्यटन स्थळी १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशी पर्यटकांच्या गर्दीला पारावार नसतो. त्यामुळे नेरळ माथेरान घाटरस्ता पर्यटकांच्या वाहनांनी ओसंडून वाहत असतो. सर्वाधिक त्रास नेरळ स्थानकात टॅक्सी साठी उभ्या असलेल्या पर्यटकांचे मेगा हाल सकाळ पासून सुरू झाले. आज सुट्टी असल्याने मुंबई येथून उपनगरीय लोकल ने सकाळपासून पर्यटक येत होते. सकाळी सात पर्यंत नेरळ माथेरान टॅक्सी सेवा सुरळीत सुरू होती.

परंतु त्यानंतर येणारी उपनगरी लोकल माथेरान जाणाऱ्या पर्यटकांनी भरून येत होत्या, त्यामुळे टॅक्सी पकडण्यासाठी होणारी लाइन हुतात्मा भाई कोतवाल चौक पर्यंत पोहचली. त्यात टॅक्सी देखील नेरळ येथून माथेरान दस्तुरी नाका पर्यंत जाऊन वेळेत नेरळ येथे येत नसल्याने पर्यटकांची गर्दी वाढली.ही गर्दी नेरळ स्टेशन आळी परिसरात गर्दीने भरून गेला होता.

# अडथळा अखेर जमीनदोस्त!

## वैष्णवी हॉटेलजवळील उंचवटा नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी तोडला

| उरण | प्रतिनिधी |

गेल्या आठ ते नऊ वर्षांपासून नागरिकांच्या त्रासाचे कारण ठरलेला पेन्शनर पार्क येथील वैष्णवी हॉटेललगत नाल्यावरील उंचवटा अखेर हटविण्यात आला. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून उंचवटा तोडण्याच्या कामाला सुरुवात केली. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.




वैष्णवी हॉटेललगत नाल्यावर करण्यात आलेल्या या उंचवट्यामुळे वाहतुकीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत होता. या ठिकाणी वाहनांची कोंडी होण्याबरोबरच अनेक छोटे-मोठे अपघातही घडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. त्यामुळे हा उंचवटा हटविण्याची मागणी करण्यात येत होती.

या मार्गावर शाळा, महाविद्यालय, न्यायालय आणि ग्रामीण रुग्णालय असल्याने विद्यार्थी, पालक, रुग्ण, वकील तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असते. त्याचबरोबर केगाव, दांडा आणि मोरा परिसरातील नागरिकांसाठीही हा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ या परिसरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत होती.

# स्वातंत्र्यदिनी आदिवासी ठाकूर तरुणांचा स्तुत्य उपक्रम

| रसायनी | प्रतिनिधी |

कलोते मोकाशी ठाकूरवाडी तालुका खालापूर जिल्हा रायगड येथील नवतरुण मित्र मंडळ कलोते मोकाशी ठाकूरवाडी येथील तरुणांनी भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिवस विविध प्रकारच्या वृक्ष लागवड करून साजरा केला.



हा भाग दुर्गम आणि दुर्लक्षित असून भौगोलिक स्थितीत आजही दळणवळण साधन नाही. जल जंगलचे साम्राज्य असल्याने पर्यावरण पूरक झाडे लावण्याचा उपक्रम त्यांनी घेतला असून, आज भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिवस त्यांनी विविध प्रकारच्या औषधी वनस्पती यांची झाडे लावून साजरा केला. सुमारे तीनशे पन्नास झाडे लावताना त्यांना वन विभागाने अतिशय चांगली मदत केल्याचे निरगुडा यांनी सांगितले. पर्यावरण जगवा, पर्यावरण वाचवा हा संदेश त्यांनी कृतीतून दिला.

# उधारीचे पैसे मागितल्याने मारहाण

**पनवेल :** सिगारेटचे आणि मागील उधारीचे पैसे मागितल्याने त्याचा राग मनात धरून दोघांना मारहाण केल्याचा प्रकार खारघर येथे उघडकीस आला. या प्रकरणी हरनेक सिंग पन्नू उर्फ बिल्ल याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी हरिराम यादव हे रात्री सव्वा अकराच्या सुमारास ते आणि रवींदर हे पान टपरीवर काम करत होते. पान टपरी समोरील देवदर्शन करून बिल्डिंग येथे राहणार हरनेक सिंग यांनी त्या ठिकाणी सिगारेट घेतला त्याच्याकडून सिगारेटच्या आणि मागच्या उधारीचे पैसे मागितल्याने त्याने हरिराम याला शिवीगाळ आणि मारहाण केली.

# तरुणीसोबत लग्न न करता फसवणूक

**पनवेल :** अल्पवयीन तरुणीसोबत शारीरिक संबंध ठेवून ती गरोदर राहिली आणि तिच्यासोबत लग्न न करता फसवणूक केल्याप्रकरणी अरबाज सलीम शेख (वय २६ राहणार वडघर) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यातील अल्पवयीन तरुणी सोबत अरबाज शेख याने शारीरिक संबंध ठेवून फोटो घरच्यांना पाठवण्याची धमकी दिली आणि तिच्यासोबत पुन्हा वारंवार शरीर संबंध ठेवले आणि लग्न करणार असल्याचे सांगून कारमध्ये घेऊन जाऊन तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवून ती यात गरोदर राहिली. आणि लग्न न करता तिची फसवणूक केली.

# रस्त्यावरील उनाड गुरांचा वाहनचालकांना त्रास

| सुतारवाडी | प्रतिनिधी |



सध्या रस्त्यावर जागोजागी उनाड गुरांचा रस्त्याच्या मधोमध विश्रांती घेत असल्याचे चित्र दिसत आहे. संभेते धाटाव पर्यंत रस्त्याच्या अगदी मधोमध उनाड गुरांचा ठिय्या उभा असतो किंवा बसलेल्या अवस्थेत असतात. मात्र याचा त्रास दुचाकी, रिक्षा, अवजड सामान घेऊन जाणारे ट्रक, तसेच अनेक नागरिकांना होत असतो.

ही उनाड गुर रात्रंदिवस रस्त्याच्या मधोमध ठिय्या मांडून असतात. कधी कधी तर रात्रीच्या वेळी रस्त्यावर बसलेली गुर भरघाव वेगाने जाणाऱ्या वाहन चालकांना दिसत नाहीत. असे वाहन चालक अपघात करून तिथून पसार होतात. मात्र गुरांच्या मालकांना याचे काहीच सोयर सुतक नसल्यामुळे किमती जनावर अपघातात मृत्यू पावतात. रस्त्यावर उनाड गुरांप्रमाणेच भटके कुत्रेही मोठ्या प्रमाणावर फिरताना दिसतात. यांचाही त्रास वाहनचालकांना होत असतो. उनाड गुरांना बंदिस्त करून त्यांना योग्य ठिकाणी ठेवण्याची मागे हवा पसरली होती. मात्र त्याची काहीच कारवाई झालेली नाही. त्यामुळे गुरांचे मालक गुरांकडे लक्ष न देता. त्यांना बेवारस सोडून देऊन मोकळे होतात. मात्र याचा त्रास अनेकांना होत असतो.

# स्वातंत्र्यदिनी करंजाडेतील आदिवासी वाड्यांत जात प्रमाणपत्रांचे विशेष वितरण

## प्रक्रिया पूर्ण; प्रशासन पोहोचले आदिवासींच्या दारी

| पनवेल | प्रतिनिधी |

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून उपविभागीय अधिकारी कार्यालय आणि तहसीलदार कार्यालय, पनवेल यांच्या वतीने करंजाडे परिसरातील आदिवासी वाडी, गायकर वाडी, लालवाडी आणि वरची वाडी येथे विशेष जात प्रमाणपत्र वितरण शिबिर घेण्यात आले.

शासन आपल्या दारी या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात आदिवासी बांधव तसेच विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे ११ ऑगस्ट रोजी अर्ज व कागदपत्रांची पूर्तता करून




अवघ्या चार दिवसांत प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. १५ ऑगस्ट रोजी संबंधित लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रत्यक्ष वितरित करण्यात आल्याने नागरिकांना तहसील कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागल्या नाहीत.

पाच वर्षांच्या बालकांपासून ते ६५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिकांपर्यंत विविध वयोगटातील लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, शासकीय योजना आणि आरक्षणाच्या लाभांसाठी जात प्रमाणपत्राचे महत्त्व यावेळी समजावून सांगण्यात आले.

पनवेलचे उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांनी आदिवासी वाडीत उपस्थित राहून लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण केले. यावेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधत महसुली प्रश्न आणि शासकीय योजनांबाबत माहिती घेतली. जात प्रमाणपत्र हे सामाजिक, शैक्षणिक आणि शासकीय हक्कांसाठी महत्त्वाचे दस्तऐवज असून ते सुरक्षित जतन करण्याचे आवाहन चांडक यांनी केले.

# निवडक

## विद्यार्थ्यांना गणवेश वाटप



**उरण :** विविध व्यासपीठावर आपल्या समलोचन आणि निवेदनातून समाज प्रबोधन करून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या शिवसंकल्प समालोचक असोसिएशनच्या माध्यमातून स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येस कोप्रोली आदिवासी शाळेतील विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश वाटप आणि खाऊवाटप व स्नेहभोजनाचा कार्यक्रम पार पडला. आपल्या समालोचन निवेदनाच्या मिळणाऱ्या मानधनातून काही रक्कम स्वइच्छेने असोसिएशनकडे जमा करून १० वी नंतर गरिबीमुले शिक्षण घेण्यास असमर्थ असणाऱ्या व ११ वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक अर्थसहाय्य, गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत, शाळांना संगणक, प्रिंटर अशी शैक्षणिक उपकरणे, अपंगांना व्हील चेअर, सायकल, शाळांना ब्लूटूथ स्पीकर, स्नेहभोजन तसेच वस्त्रदान असे सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या शिवसंकल्प समालोचक असोसिएशन च्या वतीने स्टेप आर्ट डान्स अकॅडमी च्या मार्गदर्शिका सुनंदा कुमार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, शाळेचे मुख्याध्यापक कल्पेश ठाकूर यांच्या तर्फे शालेय गणवेश वाटप आणि मोरा उरण येथील साईंचे निस्सीम भक्त आकाश कोळी यांची सुकन्या सबुरी हिच्या वाढदिवसाप्रित्यर्थ स्नेहभोजन असे विविध उपक्रम आयोजित केले होते.

## न्हावा शेवा विभागात जनजागृती उपक्रम



**उरण :** स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून नशामुक्त भारत अभियान अंतर्गत दर्शन नाईक, प्रतीक अमृते आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी न्हावा शेवा पोलीस विभागासाठी मद्यपानाच्या व्यसनाबाबत जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केला.या उपक्रमाद्वारे मद्यपान हे केवळ व्यसन नसून एक आजार आहे, हा महत्त्वाचा संदेश देण्यात आला. मद्यपानाचे व्यसन कोणत्याही व्यक्तीला तिचे वय, व्यवसाय, जात किंवा सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी न पाहता होऊ शकते. त्यामुळे व्यसनाधीन व्यक्तीकडे दोषी म्हणून न पाहता तिला योग्य उपचार, आधार आणि पुनर्वसनाची संधी देणे आवश्यक आहे, याबाबत जनजागृती करण्यात आली. या सामाजिक उपक्रम ासाठी न्हावा शेवा पोर्ट डिव्हिजन, नवी मुंबईचे एसीपी विजय चौधरी आणि न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूरज पाटील यांनी मद्यपानाच्या समस्येची गंभीरता ओळखून या जनजागृती उपक्रमाला सहकार्य केल्याबद्दल दर्शन नाईक, प्रतीक अमृते आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. नशामुक्त भारत या संकल्पनेला बळ देण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## ६५ वर्षीय सराईत चोरटा अटकेत

**पनवेल :** शाळा आणि महाविद्यालयांनाच लक्ष्य करून चोरी व घरफोडी करणाऱ्या ६५ वर्षीय सराईत चोरट्याला कळंबोली पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे अटक केली. शेखर सेरप्पा पुजारी (६५, रा. खार, मुंबई) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून चोरीची १ लाख ७६ हजार ७७० रुपयांची रोकड तसेच घरफोडीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले. कळंबोली सेक्टर १४ येथील एमईएस पब्लिक स्कूलमध्ये ११ ऑगस्टच्या मध्यरात्री चोरी झाली होती. आरोपीने शाळेच्या कार्यालयाच्या खिडकीचे ग्रील कापून आत प्रवेश केला आणि कार्यालयात ठेवलेली रोकड लंपास केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे आणि पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा माग काढत पोलिसांनी खार, मुंबई येथून शेखर पुजारी याला ताब्यात घेतले. पोलिसांच्या तपासात आरोपीची चोरी करण्याची पद्धत समोर आली आहे. सर्वसामान्य घरांऐवजी शाळा आणि महाविद्यालयांना लक्ष्य करून चोरी व घरफोडी करण्याची त्याची मोडस ऑपरेंडी असल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीचा नवी मुंबई परिसरातील शैक्षणिक संस्थांमध्ये यापूर्वी झालेल्या चोरीच्या घटनांशी संबंध आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. शेखर पुजारी हा शाळा आणि महाविद्यालयांमधील चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांसाठी पोलिसांच्या रेकॉर्डवर असल्याचे तपासात समोर आले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल-७५५९१८४६१२
- **जन्नावर हॉस्पिटल चेंढरे** अलिबागमध्ये कामासाठी मावशी, स्टाफ नर्ससाठी जागा आहे. संपर्क : ७७९८०३४५०९
- **ऑफिस स्टाफ आवश्यक** Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियम वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड संपर्क : ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८ इच्छूक उमेदवारांनी संपर्क साधावा.
- **गाळा भाड्याने मिळेल.** ९४२३३७५१९८/८४११०१६४४४
- **डिलेव्हरीसाठी माणसे पाहिजेत.** फक्त अलिबाग परिसरातील गरजुनी १)पोयनाड, वडखळ, पेण, २) रेवदंडा मुरुड, श्रीवर्धन, ३) बाईक आमची लायसन्स पाहिजे. ४) कॉम्प्युटर ऑपरेटर सकाळी ९-०० ते १.०० व दुपारी ३.०० ते ७.०० ५) पार्ट/फुल टाईम चालेल. मो.नं.८८८८२२०२२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# 'कुटुंब कीर्तन' प्रयोगाला अलिबागकरांचा प्रतिसाद



संदीप गोठीवरेकर

मनोरंजन आणि प्रबोधनाचा मिलाप असणारा कुटुंब किर्तन या नाटकाचा प्रयोग आपल्या अलिबागमध्ये दिनांक १७ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ९.३० वाजता आपल्या सुसज्ज पीएनपी नाट्यगृहात होत आहे नाट्यगृहात बॅनर लावल्यापासून फोन बुकिंग सुरू झाले एवढी लोकप्रियता या नाटकाची आहे

संकर्षण कराडे व अमेय दक्षिणदास लिखित या नाटकातून संकर्षण कराडे व जेष्ठ अभिनेत्री वंदना गुप्ते यांच्या प्रमुख भूमिका आहेत निर्मिती गौरी प्रशांत दामले यांची आहे. या नाटकाच्या निमित्ताने संकर्षण व वंदना गुप्ते प्रथमच एकत्र काम करीत आहेत. संकर्षण लेखक असलेले व प्रशांत दामले निर्मिता असलेले हे चौथे नाटक आहे हे नाटक विनोदी अंगाने जाणारे धमाल कौटुंबिक नाटक असून सासु सुनेची आणि तारांबळ उडवणाऱ्या नवऱ्याची गोष्ट आहे. जुन्या रूढी परंपरा आणि आजच्या काळातील अनेक बदलते संदर्भ यांचा मेळ घालत मनोरंजनाबरोबर प्रबोधन : एक अविवाहित कीर्तनकार शाश्वत पांडुरंगाचा ध्यास आणि आईची चिंता यामुळे तो अविवाहित राहतो आणि एकमेकांची काळजी घेत दिवस जातात अशात एक स्थळ सांगून येते निसर्ग नियमाप्रमाणे सासु सुनेचा संघर्ष आणि हे कीर्तन आपल्यासमोर उभे राहते येथे संघर्ष हा जुन्या व नव्या चा आधुनिक जीवनशैली नात्यांमधील परस्पर संबंध घेतलेला उभा छेद आणि त्यातल्या चुकीच्या गोष्टी जाणून घेऊन सर्व समावेशक आयुष्य जगण्याची दृष्टी देणारा मूल्य परंपरा जपत जगावं कसं हे दाखवून देणारे नाटक कुरबुरीला अधिक महत्त्व न देता जुळवून घेण्याची वृत्ती आपलीशी केली की जगणं सोपं होतं अशाच पेचात सापडलेला आई आणि बायको या दोन नात्याचा समतोल साधताना होणारी तारांबळ पण मूळ कीर्तनकर असलेला पिंड, उपजत हुशारी वैचारिक सामर्थ्य यातून कसा मार्ग काढतो याचा विनोदी अवतार म्हणजेच कीर्तन होय कीर्तनच्या माध्यमाने नातेसंबंधसह आपला विचार आहार आणि जीवनशैली वर केलेले भाष्य अंतर्मुख करणारे आहे.

या संकर्षण कराडे यांनी नाटक लिहिले आहे एक मनस्वी कवी आणि चतुरस्त्र अभिनेता अशी ओळख त्यांच्या कवीतेतून आणि मुलाखतीतून तो अनेकदा दिसतो. त्याच्या भाषेमुळे जिव्हाळा अधिक उठावदार होतो सर्वार्थीने त्याचा गुरु असलेला सुपरस्टार प्रशांत दामले याचं कुठलही नाटक हाउसफुल्ल करण्याची कसब तो अंगी बाणवत चालला आहे हे एक वैशिष्ट्य आहे हे त्यांना वंदना गुप्ते आणि नुपूर चितळे यांनी भरपूर साथ दिली. वंदना ताईची माया आणि सासूचा तोरा सहज अभिनयातून दिसतो. नाटक अमेय दक्षीणदास अनुभवी आणि प्रयोगशील दिग्दर्शकाने विचार पूर्वक बसवला या नाटकाचा उत्तम समतोल, साधकाचे श्रेय दिग्दर्शकाला.

अशोक पत्की यांचे संगीत प्रदीप मुळे हयांचे नेपथ्य विषय जुना वाटला तरी नवी ऊर्जा आणि दृष्टी देणारे व हसत खेळत आपल्या चुका दाखविणारं नाटक कुटुंब कीर्तन पुन्हा पुन्हा पहावं असं वाटणारे पाचशे व हजार प्रयोग हाऊस फुल होणारे क्षमता असलेले नाटक आहे. **

# जिल्ह्यात जलसंधारण वाढवण्यावर भर

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्यात १५ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह' आणि १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या निश्चित करून परस्पर समन्वयाने कार्य करत जलसंधारण सप्ताह व अभियान प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी कविजीत पाटील, अलिबाग नगर परिषद मुख्याधिकारी सागर साळुंके यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी प्रत्यक्ष तर जिल्ह्यातील इतर अधिकारी दुरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले, २१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकेथॉनवॉक फॉर वॉटर'चे आयोजन करण्यात यावे. यामध्ये लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, क्रीडापटू, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग घेण्यात यावा.

वॉकेथॉनच्या मार्गावरील वाहतूक, सुरक्षा, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता तसेच अन्य आवश्यक सुविधांचे योग्य नियोजन करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

युवकांना जल व मृदसंधारणाच्या चळवळीशी जोडण्यासाठी १५ ते १९ ऑगस्ट २०२६ दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या 'रील फॉर सोइल अँड वॉटर कन्झर्वेशन'या इन्स्टाग्राम रील स्पर्धेत जिल्ह्यातील १५ ते ३० वयोगटातील युवकांचा अधिकाधिक सहभाग नोंदविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. महाविद्यालये, युवक मंडळे व सामाजिक संस्थांच्या माध्यमातून या रिल स्पर्धेची व्यापक स्वरुपात जागृती करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

गावोगावी नाले, बंधारे, तलाव तसेच पाणलोट क्षेत्राच्या संवर्धनाबाबत जनजागृती केली जाणार आहे. पाण्याची बचत जलस्त्रोतांचे योग्य व्यवस्थापन तसेच भविष्यातील पाणी टंचाई टाळण्यासाठी ग्राम पंचायत स्तरावरील नियोजन महत्वाचे आहे. 'एक गाव एक जलसंधारण संकल्प' या भावनेतून प्रकल्प राबविले तर त्याचा अधिक दिर्घकालीन फायदा होणार आहे.

जलसंधारण अभियानाच्या कालावधीत शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, चित्रकला व वादविवाद स्पर्धा घेण्यासोबतच 'एक शाळा एक शोषखड्डा' हा उपक्रम प्रभावीपणे राबवावा. ग्रामीण व शहरी भागात लोकसहभागातून जलसंधारण कामांचे लोकार्पण, वृक्षारोपण व जलस्रोत स्वच्छता उपक्रम राबवून त्यामध्ये नागरिकांचा सहभाग वाढवावा.

## मार्गावरील धोकादायक दगड आयआरबीने हटवले

। रसायनी । प्रतिनिधी ।

लोधीवली हद्दीतील काळंबा मंदिर ते दांडफाटा दरम्यान धोकादायक माती आणि दगड हटविण्याचे काम आयआरबी या रस्ते देखभाल दुरुस्ती करणाऱ्या कंपनीने सुरू केले असून या मार्गावरून प्रवास करणाऱ्या चालक व प्रवासी यांनी समाधान व्यक्त केले आहे.



मुंबई-पुणे रस्त्यावर दोन्ही बाजूला असणाऱ्या जमीन मालकांनी आपला भूखंड विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. मात्र या हे विकसक मुंबई-पुणे रस्त्यावरून आपल्या जागेत रस्ता करत असताना किंवा स्वतःच्या जागेत जाताना होणारी नासधूस याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसते. आपल्या जागेत बांधकाम करताना उर्वरित दगड, वाळू, माती ही तशीच ठेवून देतात. त्यामुळे रस्त्यावरून जाणारे पाणी याला निचरा होण्यास अडचण होते. मागील महिन्यातील पावसाने येथे मोठे पाणी साचल्याने काही काळ रस्ता बंद पडला होता. वाहतूक कोंडी बरोबर वाहनांना त्रासदायक ठरत असून प्रवासी यांच्या जीवावर बेतत आहे. अपघातांना निमंत्रण दिले जात आहे. स्थानिक नेत्यांनी ही बाब आयआरबी यांच्या लक्षात आणून दिली आहे. आयआरबी यांच्या लोणावळा येथील कार्यालयाने याची गंभीर दखल घेतली असून वरिष्ठ अधिकारी यांच्या आदेशानुसार लोधीवली हद्दीतील काळंबा मंदिर ते दांडफाटा मार्गावरील अडचण दूर करण्यास सुरुवात केल्याची आयआरबीचे अभियंता अनिल धायगुडे यांनी सांगून ग्रामपंचायत चौक सरपंच रितू ठोंबरे यांनी दिलेल्या पत्रानुसार चौक रेल्वे स्थानक येथे जाणाऱ्या रस्त्यावर संरक्षक खांब उभे करण्यात आले आहेत. चौक नवीन वसाहत व मोरबे धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या वळणावर अगोदर दोन्ही बाजूला गतिरोधक बसविण्याबाबत वरिष्ठ कार्यालय यांच्याकडे मार्गदर्शन मागविण्यात आले असून चौक ग्रामपंचायतीच्या पत्राची दखल घेण्यात येऊन योग्य ती उपाय योजना राबवण्यात येईल. ज्यांच्या मुळे या रस्त्याला त्रास होत आहे, अशा जमीन मालकांना व ठेकेदार यांना कायदेशीर नोटीस देण्यात येईल असे आयआरबी अभियंता अनिल धायगुडे यांनी सांगितले.

## श्रीवर्धनमध्ये अखंड भारत संकल्प अभियान दिन साजरा

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन शहरातील दाबक पाखाडी येथील क्षत्रिय माळी समाजाच्या हॉलमध्ये अखंड भारत संकल्प अभियान दिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन सकल हिंदू समाजातर्फे करण्यात आले होते.

१९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला. पण याच वेळी अखंड असलेल्या भारताचे दोन तुकडे झाले. धर्माच्या आधारावरती पाकिस्तान या देशाची इस्लामिक देश म्हणून फाळणी करण्यात आली.

ही फाळणी इतक्या अचानकपणे करण्यात आली की, पाकिस्तान मध्ये राहणाऱ्या हिंदूंना स्वतंत्र झालेल्या भारतामध्ये विस्थापित म्हणून यावे लागले. तर लाखो लोकांना आपले जीव गमवावे लागले. स्त्रियांवरती प्रचंड अत्याचावर झाले.

आपली मूळ असलेली घरे, जमीन, शेती हे सर्व सोडून अनेक विस्थापित आश्रयाला भारतामध्ये आले. या अगोदर देखील अखंड भारताचे अनेक वेळा तुकडे झाले होते. अफगाणिस्तान हे वेगळे राष्ट्र निर्माण करण्यात आले होते. नेपाळ भारतापासून वेगळा झाला होता. तर ब्रह्मदेश हा देखील भारतापासून वेगळा झाला होता. पुन्हा एकदा तुकडे झालेला भारत देश एकत्र व्हावा. ही सर्व भारतीयांची इच्छा आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयीन तरुण व तरुणी यांची उपस्थिती खूप मोठ्या प्रमाणात होती.

सर्वप्रथम उपस्थित तरुणांना श्रेयस पेंडसे यांनी मार्गदर्शन केले व त्यानंतर विभाजन की विभिषिका ही चित्रफीत त्या ठिकाणी दाखवण्यात आली. अखंड भारत संकल्प अभियान दिन संपूर्ण देशामध्ये साजरा करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी विश्वहिंदू परिषदेचे जिल्हा सह मंत्री जितेंद्र करंजकर, प्रखंड अध्यक्ष संतोष चौकर,गोरक्षा प्रमुख अजय चव्हाण, प्रणय पेडणेकर यांनी विशेष मेहनत घेतली.


ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.

मोबाईल : ९८६०६५८५६५



**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


### जाहीर नोटीस

सर्व संबंधित व्यक्ती, संस्था आणि हितधारकांस सूचित करण्यात येते की, मौजे कासेखोल, ता. तळा, जि. रायगड येथील खाली नमूद केलेली जमिनीचे आमचे आशिलाने खरेदी करण्याचे ठरवले आहे. तरी, खाली नमूद करण्यात आलेल्या जमिनीबाबत जर कोणत्याही व्यक्ती, संस्था, ट्रस्ट, सहकारी संस्था, कूळधारक, खरेदीदार, मुद्रक, गहाणदार, तारणदार, भाडेकरू किंवा इतर कोणालाही कोणत्याही प्रकारचा हक्क, स्वत्व, दावा, अडचण, अडथळा किंवा कोणतेही कायदेशीर संबंध असल्यास, तश्या व्यक्तींनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत योग्य त्या लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सादर कराव्यात.

जर दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर जमीन निर्विघ्न आणि निर्विवाद आहे आणि जमीन मालकाला सदर मिळकत विकण्याचा अधिकार आहे, असे मानले जाईल आणि आमचे आशिल त्यानुसार खरेदी व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या अशिलांवर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक राहणार नाहीत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कासेखोल, ता. तळा, जि. रायगड**

| भूमापन क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) | भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|
| २३/१ | ११.९३.००+६.२५.००= १८.१८.०० | ५.०० | स्वप्नाली चेतन भट |

अलिबाग
दि. १६-०८-२०२६

**ॲड. सचिन जोशी**
पत्ता-फ्लॅट नं.३. साईलीला बिल्डिंग,
श्रीबाग नं. २, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. ९८२२६५३६५५

नि.नं.
ने. ता. २४/९/२०२६

वादीतर्फे वकील,
श्री. सुरेंद्र नारायण जोशी,
नि.५४/ड

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात,**

स्पेशल मुकदमा नं.८६/२०२५.

सौ. स्मृती सुहास राऊत, -- वादी
विरूद्ध
श्री. पांडुरंग रामचंद्र दर्णे, वगैरे --प्रतिवादी

प्रति,
१२. मे. ग्याना एन्टरप्रायझेस, तर्फे
प्रोप्रा. श्री. मुकेश के. अरेठिया,
रा. सदनिका क्र. १०१,
भूखंड क्र. ३३, मारूती निवास,
सेक्टर २, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड.

ज्याअर्थी, वादीने या न्यायालयात स्पे.मु.नं.८६/२०२५ चा दावा ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला असून त्या दाव्याचे कामी तुम्हाला प्रतिवादी म्हणून सामील केले आहे.

आणि ज्याअर्थी, तुम्हांस या न्यायालयाने सदर दाव्याचे कामी समन्स/नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकलेली नाही. त्यामुळे सदर समन्स/नोटीसची बजावणी जाहीर नोटीशीद्वारे करण्याचा आदेश मा.न्यायालयाने केला आहे.

त्याअर्थी, तुम्हांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, या दाव्याचे कामी आपण नेमल्या तारखेस म्हणजे दिनांक २४/०९/२०२६ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सकाळी ११.०० वाजता हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. सदर नेमल्या तारखेस आपण या न्यायालयात गैरहजर राहिल्यास तुमचेविरूद्ध सदर दाव्याचे कामी एकतर्फी सुनावणीचा आदेश करण्यात येईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस मा न्यायालयाचे आदेशाने, न्यायालयाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली.

पनवेल,
तारीख : १२.०८.२०२६

सही/-
क. लिपीक,
दिवाणी न्याया. व. स्तर, पनवेल

सही/-
वरिष्ठ स्तर,
सहा.अधिक्षक,
दिवाणी न्याया. व. स्तर, पनवेल

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. लालचंद गंगाधर पाटील यांनी मौजे मुळे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सागर चंद्रकांत म्हात्रे, सोनाली चंद्रकांत म्हात्रे, श्री. समीर देवेंद्र चौगुले यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले असून तसा साठेकरार त्यांचेदरम्यान स्वाक्षरीत झालेला आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**:: मिळकतीचे वर्णन ::**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पैसे) | भुधारणा पद्धत |
|---|---|---|---|---|
| मुळे | ८७ | २-२५-०० | ०.०० | वर्ग-२ |

सदरहू वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत आमचे अशिलांस कायमस्वरूपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतींत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार / हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार बोलणी सफल झाल्यास खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : /०८/२०२६

सही/-
**ॲड. ओमकार सिताराम कदम**
पत्ता : वाघोडे, ता. अलिबाग,
जि. रायगड मोबाईल नं. : ७७१९८४६५५४

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत कै. जनार्दन दामोदर पाटील मयततर्फे वारस दयानंद पाटील यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील कै. जनार्दन दामोदर पाटील मयततर्फे वारस दयानंद पाटील यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वास कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| पेढांबे ता.अलिबाग. | १५१ | ०-०२-५० एकूण | ०-०५ |

अलिबाग,
दिनांक : १६/०८/२०२६.

सही/-
**(ॲड. स्वप्निल सुधाकर पाटील)**
मु.एम.आय.डी.सी.रोड, वायशेत,
पो.नवगाव, ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्रीमती रत्नप्रभा लक्ष्मण पाटील, श्रीमती मालती मधुकर पाटील, श्रीमती लता महादेव म्हात्रे, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकतीपैकी श्रीमती रत्नप्रभा लक्ष्मण पाटील, श्रीमती लता महादेव म्हात्रे, यांच्या अविभक्त हिश्श्याची जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती रत्नप्रभा लक्ष्मण पाटील, श्रीमती लता महादेव म्हात्रे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वास कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| पेढांबे ता.अलिबाग. | २३२ | ०-४६-८० ०-०४-१० पो.ख. ०-५०-९० एकूण | १२-१९ |

सदरील शेतजमिन मिळकतीपैकी श्रीमती रत्नप्रभा लक्ष्मण पाटील, श्रीमती लता महादेव म्हात्रे, यांच्या अविभक्त हिश्श्याची जमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १६/०८/२०२६.

सही/-
**(ॲड. स्वप्निल सुधाकर पाटील)**
मु.एम.आय.डी.सी.रोड, वायशेत,
पो.नवगाव, ता.अलिबाग, जि.रायगड

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे पेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत कै. रामकृष्ण लक्ष्मण पाटील मयततर्फे वारस हर्षल रामकृष्ण पाटील, मुग्धा रामकृष्ण पाटील, पुर्णा सागर पाटील, क्षितीज सागर पाटील, स्मिता ज. पाटील, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील कै. रामकृष्ण लक्ष्मण पाटील मयततर्फे वारस हर्षल रामकृष्ण पाटील, मुग्धा रामकृष्ण पाटील, पुर्णा सागर पाटील, क्षितीज सागर पाटील, स्मिता ज. पाटील, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला माझे अशिलांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वास कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| पेढांबे ता.अलिबाग. | १५० | ०-१२-७० एकूण | ०-४४ |

अलिबाग,
दिनांक : १६/०८/२०२६.

सही/-
**(ॲड. स्वप्निल सुधाकर पाटील)**
मु.एम.आय.डी.सी.रोड, वायशेत,
पो.नवगाव, ता.अलिबाग, जि.रायगड

### सार्वजनिक नोटीस

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, मी श्री. मितेश हसमुख कल्याणी, वय ५५ वर्षे, कायमस्वरूपी रा. ३६/६, श्रीनिकेतन बिल्डिंग, दादी सेठ रोड, चौपाटी बँड स्टँड, मुंबई - ४००००६; सध्या रा. ७७०/३, निर्मल कुंज, टी. एम. दामाणी रोड, खंडोबा मंदिराजवळ, रोहा, तालुका रोहा, जिल्हा रायगड - ४०२१०९, यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC), मुंबई येथील जन्म व मृत्यू निबंधक (Registrar of Births and Deaths) यांचेकडे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. यास कोणी हरकत अथवा आक्षेप असल्यास, ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली दिलेल्या मोबाईल क्रमांकावर लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल आणि त्याबाबत कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही. मोबाईल क्रमांक : ९९७५५६५५४४.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७/०८/२०२६
**श्री. मितेश हसमुख कल्याणी**
अर्जदार

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे पिंपळोली, ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**
**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | स.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्रीम. कल्पना रमेश शिंदे | ५९/२ | ३-८५-०० | १-०० |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणातीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १६/०८/२०२६
**खरेदी घेणार-श्री. रोनक रामदास घरत.**
रा. मातृछाया बंगलो, शंकर नगर,
पेण, जि. रायगड.
मो. नंबर ७३८५६६७०११

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं ७
पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे केळवणे, ता. पनवेल, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४२/५/ब | एकूण क्षेत्र ०-२२-०० हे.आर | ०.७५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-१७/०८/२०२६

सही/-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णनाची मौजे, नागाव, तालुका- अलिबाग जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. विनीता विरेंद्र पाटील रा. कुरुळ, ता. अलिबाग यांच्या मालकी हक्काची मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| नागाव | १३६० | ०.१२.०० पो.ख.क्षेत्र ०.०१.०० एकुण क्षेत्र ०.१३.०० | ३.३७ |

वर नमूद मिळकती पैकी सौ. विनीता विरेंद्र पाटील यांच्या मालक्की हक्कातील मिळकत क्षेत्र ०.०२.७० हे. आर मिळकतीचे.

सदरची मिळकत वरील विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांस दिलेला आहे. मात्र, तरीदेखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, इजमेंट, बोजा, साठेकरार, ताबा कब्जा, लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापांसून ७ (सात) दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरुपात समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख - १६/०८/२०२६

**ॲड. मनोज परशुराम ओव्हाळ**
रजिस्ट्रर ऑफिस समोर अलिबाग गाळा नं.६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक शिवराम रामचंद्र खंडागळे वगैरे ३ तर्फे अखत्यारी सखाराम बाळु खंडागळे रा. वैतागवाडी, पो. नाडसूर, ता. सुधागड, जि. रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - धोंडसे, ता.- सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| ४५ | १ | ३-६०-० | १.०० |

पैकी मिळकत मालकांचे मालकीचे क्षेत्र २-२०-० हे. आर पैकी क्षेत्र खरेदी करणार आहेत.

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत वरील मिळकतीचे खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक १७/०८/२०२६

**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५

# प्रियांशी पाटीलची आंतरराष्ट्रीय भरारी

## सलग दोन वर्षे 'एशियन मेडलिस्ट'चा मान



। उरण । प्रतिनिधी ।

उरण बोरी येथील रोटरी इंग्लिश मीडियम हायस्कूलमधील इयत्ता नववीतील विद्यार्थीनी प्रियांशी पाटील हिने विंडसर्फिंग क्रीडा प्रकारात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिने उरणसह रायगड आणि महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण कामगिरी करत सलग दुसऱ्या वर्षी 'एशियन मेडलिस्ट'चा मान मिळवला आहे.

प्रियांशी पाटील हिने २०२५-२६ या कालावधीत टेक्नो २९३ गट १५ आणि गट १७ गर्ल्स विभागात तब्बल १४ राष्ट्रीय आणि ३ आंतरराष्ट्रीय पदके मिळवत आपल्या क्रीडा कारकिर्दीची दमदार छाप उमटवली आहे. त्याचबरोबर यार्टिंग असो.ऑफ महाराष्ट्रच्या माध्यमातून विंडसर्फिंगमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. २०२५ मध्ये सिंगापूर येथे झालेल्या इंटरनॅशनल ओपन विंडसर्फिंग चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक, त्यानंतर नोव्हेंबर २०२५मध्ये थायलंड येथे झालेल्या एशियन चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक पटकावत प्रियंशीने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली क्षमता सिद्ध केली. एवढ्यावरच न थांबता एप्रिलमध्ये झालेल्या विंडसर्फिंग वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये टॉप-१० मध्ये स्थान मिळवत तिने पुन्हा एकदा आपल्या आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रचिती दिली. त्यानंतर जुलैमध्ये पोलंड येथे झालेल्या युरोपियन चॅम्पियनशिपमध्येही सहभाग नोंदवला. ४ ते ८ ऑगस्ट दरम्यान मलेशिया येथे झालेल्या एशियन चॅम्पियनशिपमध्ये प्रियांशीने चुरशीच्या शर्यतीत दमदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावले. या कामगिरीमुळे २०२५ आणि २०२६ अशी सलग दोन वर्षे आशियाई स्तरावर पदक मिळवणाऱ्या महाराष्ट्रातील कमी वयाच्या खेळाडूंमध्ये तिच्या नावाची विशेष नोंद झाली आहे. अत्यंत कमी वयात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या प्रियांशीच्या यशाचे उरण परिसरासह महाराष्ट्रातून कौतुक होत आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे कुटुंबीय, शाळा, क्रीडा क्षेत्र आणि संपूर्ण परिसराचा गौरव वाढला असून भारताचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावले आहे. विशेष म्हणजे कोणतेही प्रशिक्षक नसताना केवळ आई वडिलांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे यश मिळविले आहे. भविष्यात प्रियांशीने भारतासाठी आणखी मोठी पदके जिंकावीत आणि देशाचा तिरंगा आंतरराष्ट्रीय क्रीडा मंचावर अभिमानाने फडकवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## निवडक

### भारतीय महिला क्रिकेटचा संघ जाहीर

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने शुक्रवारी आगामी महिला आशिया चषकासाठी संघ जाहीर केला. दि.२८ ऑगस्ट ते १३ सप्टेंबर दरम्यान दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणाऱ्या महिला आशिया चषकात भारतीय संघाचे नेतृत्व हरमनप्रीत कौर करणार आहे. हरमनप्रीतला नेतृत्वाचा मोठा अनुभव आहे. तिच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२५ मध्ये महिला क्रिकेट विश्वचषक आपल्या नावावर केला होता. अगामी आशीया चषक स्पर्धेसाठी भारतीय संघ सज्ज झाला असून, संघाची घोषणा देखील झाली आहे. परंतु, यामध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. भारताची स्टार खेळाडू जेमिमा रॉड्रिग्स जिने विश्वचषक २०२५ च्या स्पर्धेत महत्त्वाचा वाटा उचलला होता, ती खेळाडू आता हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे बाहेर झाली आहे. तिच्या जागी बीसीसीआयने बदली खेळाडूची घोषणा केली आहे. जेमिमा रॉड्रिग्स हॅमस्ट्रिंगच्या गंभीर दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर झाली असून, तिच्या जागी प्रतिका रावलला संघात स्थान मिळाले आहे. त्यामुळे बीसीसीआयकडून संघाची घोषणा करण्याची ही दुसरी वेळ आहे. यापूर्वी आशिया चषकाचे वेळापत्रक उपलब्ध नसल्यामुळे संघाची घोषणा करण्यात आली नव्हती. भारताच्या महिला संघात हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), शेफाली वर्मा, भारती फुलमाली, दीप्ती शर्मा, ऋचा घोष (यष्टीरक्षक), गुणालन कमलिनी (यष्टीरक्षक), अरुंधती रेड्डी, प्रेमा रावत, राधा यादव, श्री चरणी, नंदनी शर्मा, क्रांती गौड आणि प्रतिका रावल यांचा समावेश आहे.

### पंतने मोडला गिलख्रिस्टचा विक्रम

**कोलंबो :** भारताचा संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी



सामना गॉलच्या मैदानावर सुरु आहे. या सामन्यातील सुरुवातीच्या दोन्ही दिवशी भारतीय फलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. सामन्यातील पहिल्याच दिवशी फलंदाजी करताना देवदत्त पडिक्कल शतकी खेळी करुन नाबाद परतला. तर, ऋषभ पंत २७ धावांवर नाबाद परतला. यादरम्यान पंतने ६८ व्या षटकात फलंदाजी करताना खणखणीत षटकार खेचला. या षटकाराह त्याने ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज ॲडम गिलख्रिस्टचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. ऋषभ पंत कसोटी क्रिकेटमध्येही मोठे फटके मारण्यासाठी ओळखला जातो. या सामन्यातही त्याने काही मोठे फटके मारले. दरम्यान, श्रीलंकेकडून ६८ वे षटक टाकण्यासाठी प्रभात जयसूर्या गोलंदाजीला आला. त्यावेळी पंतने लाँग ऑनच्या वरुन खणखणीत षटकार खेचला. हा पंतने परदेशात कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना मारलेला ५७ षटकार ठरला. यासह ऋषभ पंत हा परदेशात फलंदाजी करताना सर्वाधिक षटकार खेचणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. या आधी गिलख्रिस्टने १९९९ ते २००८ या ९ वर्षांत परदेशात कसोटी क्रिकेट खेळताना ५६ षटकार खेचले होते. आता पंत गिलख्रिस्टला मागे टाकून पुढे गेला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार खेचण्याच्या विक्रम हा बेन स्टोक्सच्या नावावर आहे. त्याने ६९ षटकार खेचले आहेत.

### महिला बॅडमिंटन खेळाडूंनी मांडली व्यथा

**नवी दिल्ली :** कोणत्याही क्रीडा प्रकारात मासिक पाळी असताना महिलांसाठी खेळणे किती त्रासदायक असते, याबद्दल अनेकदा खेळाडूंनी भाष्य केले आहे. आता यादरम्यान बॅडमिंटन खेळादरम्यान महिला खेळाडूंना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते, याबाबत जानेवारीत दिल्ली येथे झालेल्या इंडिया ओपनच्या आयोजनावर टीका करणारी डेन्मार्कची बॅडमिंटनपटू मिया ब्लिचफेल्ड्ट आता महिलांच्या प्रश्नांवरून बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशनलाही जाब विचारत आहे. त्यासाठी तिने वुमन्स बॅडमिंटन कलेक्टिव्ह नावाची संस्था सुरू केली आहे. या उपक्रमातून तिने पहिले मोठे पाऊल उचलत चीनची स्टार हुआंग डोंग पिंग हिला महिलांच्या मासिक पाळीशी संबंधित समस्यांवर बोलण्यासाठी पुढे आणले. हुआंग डोंग पिंगने २०२१ टोकियो ऑलिम्पिकमध्ये मिश्र दुहेरीचे सुवर्णपदक जिंकले असून? ती तीन वेळा वर्ल्ड चॅम्पियनशिप पदकविजेती आहे. दरम्यान, बॅडमिंटन वर्ल्ड फ ेडरेशनने जर एखादा नियम बदलावा, असे मला वाटत असेल, तर महिलांसाठी बॅडमिंटन अधिक अनुकूल करण्यासाठी मासिक पाळीचा विचार केला पाहिजे. कधीकधी आम्हाला वॉशरूममध्ये जावे लागते आणि सध्या मिळणाऱ्या कमी ब्रेक असल्यामुळे ते कठीण होते. सुदीरमन कपदरम्यान माझ्यासोबत असेच घडले, असे हुआंगने सांगितले. तिने पुढे सांगितले की, स्कॉटलंडच्या खेळाडू क्रिस्टी गिलमोरलाही अशाच परिस्थितीचा सामना करावा लागला होता. त्यामुळे महिला खेळाडूंसाठी हा केवळ शारीरिकच नाही, तर मानसिकदृष्ट्याही आव्हानात्मक मुद्दा असल्याचं तिने अधोरेखित केले. सध्या बॅडमिंटनमध्ये स्वतंत्र टॉयलेट ब्रेकची तरतूद नाही. खेळाडू ११ गुणांच्या ब्रेकवेळी मिळणाऱ्या ६० सेकंदांच्या विश्रांतीत, किंवा प्रत्येक २१ गुणांच्या गेमनंतर मिळणाऱ्या १२० सेकंदांच्या ब्रेकमध्ये वॉशरूम वापरण्यासाठी परवानगी मागू शकतात, असेही तिने सांगितले.

# बांगलादेशसमोर कांगारूंची शरणागती

- ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसरा कसोटी विजय
- यजमानांना पराभूत करण्याची पहिलीच वेळ



। सिडनी । वृत्तसंस्था ।

बांगलादेशने पहिल्या कसोटीत उल्लेखनीय कामगिरी करताना यजमान ऑस्ट्रेलियाला चारीमुंड्या चीत केले आहे. हसन महमूद आणि मेहिदी हसन मिराझ यांच्या उल्लेखनीय गोलंदाजीच्या जोरावर बांगलादेशने पहिली कसोटी जिंकली. बांगलादेशचा हा ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुसरा कसोटी विजय ठरला असुन, ऑस्ट्रेलियाला त्यांच्या घरी पराभूत करण्याची ही बांगलादेशची पहिलीच वेळ ठरली. यापूर्वी २०१७ मध्ये बांगलादेशने मिरपूर कसोटी २० धावांनी जिंकली होती.

या कसोटी सामन्यात बांगलादेशच्या हसम महमूद (६) याच्या भेदक माऱ्यासमोर ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात शरणागती पत्करली. स्टीव्हन स्मिथच्या ७१ धावांमुळे कांगारून १९८ धावांपर्यंत पोहोचू शकले. महमूदला तस्किन अहमद (२) व इबादत होसैन (२) यांनी साथ दिली. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या बांगलादेशने पहिल्या डावात ४२६ धावा कुटल्या आणि मजबूत आघाडी घेतली. तंझीद अहमदचे (१०१) शतक अन् कर्णधार नजमूल होसैन शांतो (८४) व मेहिदी हसन मिराझ (६५) यांच्या अर्धशतकांनी संघाला मजबूत स्थितीत आणले. तसेच, मोमिनूल हस (४९) व मुश्फीकर रहिम (३६) यांनी देखील चांगला खेळ केला. यावेळी ऑस्ट्रोलीयाचा गोलंदाज जोश हेझलवूडने ६ बळी घेतले. दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाकडून दमदार खेळी खेळली जाईल, असे वाटत होते; परंतु, त्यांचा संघ २८४ धावांवर गडगडला. यावेळी बांगलादेशचे गोलंदाज मेहिदी मिराझने ५ आणि महमूदने ३ बळी घेतले. दरम्यान, कॅमेरून ग्रीनच्या (१०४) शतकाने ऑस्ट्रेलियाची लाज राखली. स्मिथने पुन्हा उपयुक्त ४४ धावा केल्या, तर ॲलेक्स करीने ३० धावांचे योगदान दिले. त्यामुळे ऑस्ट्रेलिया फक्त ५७ धावांचे माफक लक्ष्य उभे करू शकले. त्यानंतर लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशला दुसऱ्याच षटकात हेझलवूडने झटका दिला. पहिल्या डावातील शतकवीर तंझीद भोपळ्यावर त्रिफळाचीत झाला; परंतु, शादमान इस्लाम (२५) व मोमिनूल हक (३०) यांनी संघाचा विजय निश्चित केला. यावेळी बांगलादेशने ९ गडी राखून हा सामना जिंकला आणि मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

बांगलादेशच्या या विजयामुळे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्याची शर्यत अधिक रंगतदार झाली आहे. यावेळी ऑस्ट्रेलियाच्या (७७.७८) पराभवाने भारतीय संघाचे अंतिम सामन्यात पोहोचण्याचे गणित बदलले आहे. परंतु, ते अजूनही ९ सामन्यांत ७ विजय मिळवून अव्वल स्थानी कायम आहेत. त्यानंतर दक्षिण आफ्रिका ७५ टक्के व न्यूझीलंड ७२.२२ टक्क्यांसह अंतिम फेरीच्या शर्यतीत पुढे आहेत. बांगलेदशने (६६.६७) हा विजय मिळवला खरा, परंतु ते तरीही चौथ्या स्थानावरच राहणार आहेत.

# स्पेन संघाकडून ऑस्ट्रोलियाला धक्का



। माद्रिद । वृत्तसंस्था ।

स्पेनने फिफा विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाला पराभूत करून १० वर्षांनी जेतेपदाचे चषक उंचावले. परंतु, हा स्पेन फक्त फुटबॉलविश्वातच नव्हे, तर आता क्रिकेटच्या मैदानावरही आपली मक्तेदारी सिद्ध करताना दिसत आहे. स्पेनच्या क्रिकेट संघाने एक मोठा विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे. बांगलादेशकडून कसोटीत लाजीरवाणा पराभव पत्करणाऱ्या ऑस्ट्रेलियाला आता स्पेनकडूनही धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलियाच्या नावावर २००३ पासून असलेला विश्वविक्रम स्पेनने त्यांच्या नावावर केला आहे.

स्पेनने युरोप उप-प्रादेशिक पात्रता फेरी 'क' मधून २०२८ च्या टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी आपल्या पात्रतेच्या मोहिमेची सुरुवात करताना यजमान फिनलँडला १३२ धावांचा पाठलाग करताना आठ गडी राखून पराभूत केले आणि विश्व विक्रम नावावर केला. पुरुषांच्या आयसीसी टी-२० क्रमवारीत २८ व्या स्थानावर असलेल्या स्पेनचा हा सलग २१ वा विजय होता. त्यांनी तीन वर्षांपूर्वी आइल ऑफ मॅनविरुद्ध विजयी मालिका सुरू केली होती आणि ती कायम राखताना त्यांनी जर्सी, क्रोएशिया, झेक प्रजासत्ताक, ग्रीस आणि फिनलँड यांसारख्या युरोपीय प्रतिस्पर्धी संघांनाही पराभूत केले आहे. त्यांनी सलग २१ टी-२० सामने जिंकून २००३ पासून ऑस्ट्रेलियाच्या नावावर असलेला विक्रम मोडला. रिकी पॉंटिंगच्या संघाने १७ एकदिवसीय सामन्यांमध्ये अपराजित राहून जोहान्सबर्ग येथील अंतिम सामन्यात भारताला हरवून विश्वचषक जिंकला होता.

# केएल राहुलची दमदार फलंदाजी



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय संघाने श्रीलंकेविरुद्ध शनिवारी (दि.१५) सुरू झालेल्या कसोटी सामन्यात दमदार फलंदाजी केली. त्यातही देवदत्त पडिक्कल आणि केएल राहुल यांनी त्यांच्या फलंदाजीने प्रभावित केले आहे. पडिक्कलने दुखापतग्रस्त साई सुदर्शनच्या जागेवर तिसऱ्या क्रमांकावर मिळालेल्या संधीचा फायदा उचलला आणि शतक केले. परंतु, केएल राहुलचे मात्र शतक थोडक्यात हुकले.

या सामन्यात पहिल्या दिवशी यशस्वी जैस्वाल ३२ धावांवर बाद झाल्यानंतर पडिक्कल आणि केएल राहुल यांनी दमदार फलंदाजी करत १५० धावांची भागीदारी केली. पहिल्या दोन्ही सत्रात त्यांनी एकमेकांना चांगली साथ देत अर्धशतके पूर्ण केली होती. परंतु, तिसऱ्या सत्राला सुरुवात होत असताना केएल राहुलला हातात आणि पायात क्रॅम्प आल्याने नीट चालताही येत नव्हते. त्यामुळे तो ७७ धावांवर असताना रिटायर्ड हर्ट होत मैदानातून बाहेर गेलेला. त्याच्या या दुखापतीने भारतीय संघाची चिंता वाढवली होती. त्यातच शुभमन गिल १६ धावांवर बाद झाला. मात्र, दिवसाच्या शेवटी रिषभ पंतने पडिक्कलची साथ दिली. पहिला दिवस संपला, तेव्हा पडिक्कल १३१ धावांवर नाबाद होता. सामन्याच्या दुसऱ्या दिवशी मात्र पावसाने बराचवेळ खोडा घातला. अखेर दुपारी अडीच वाजताच्या दरम्यान खेळाला सुरुवात झाली. दुसऱ्या दिवशीही पंत आणि पडिक्कल यांनी चांगली सुरुवात केली होती. परंतु, पंत फार काळ टिकू शकला नाही. त्याला ६२ चेंडूत ३९ धावांवर केशरा नुवंथाने बाद केले. त्यानंतर फिट झालेल्या केएल राहुल मैदानात उतरला. पडिक्कलनंतर आता तो शतक करेल, असे चित्र होते. परंतु, दुसऱ्या दिवशी केएल राहुलला त्याची लय कायम ठेवता आली नाही. त्याला नुवंथानेच निशान फर्नांडोच्या हातून झेलबाद केले. केएल राहुल १७५ चेंडूत १० चौकार आणि १ षटकारांसह ८२ धावा करून बाद झाला. त्यामुळे जुरेल मैदानात उतरला. दरम्यान, एका बाजूने गडी बाद होत असले तरी पडिक्कलने आपली लय कायम ठेवली. त्याने त्याचे दीड शतक २१५ चेंडूत ८६ व्या षटकात पूर्ण केले. त्यामुळे भारताने ३२० धावांचा टप्पाही पार केला. हे पडिक्कलचे पहिलेच शतकही आहे.

# पालीमध्ये झालेल्या कॅरम स्पर्धेत राजेश गोहिल प्रथम

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

पाली येथे नुकत्याच रायगड जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा येथील भक्तनिवासाच्या दोन हॉलमध्ये पार पडली. यावेळी जिल्ह्यातील तब्बल ६४ कॅरमपटूंनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत राजेश गोहिल यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर, पनवेलच्या अश्रफ खान यांनी द्वितीय आणि कामोठे येथील वैभव शिंदे यांनी तृतीय क्रमांक मिळविला आहे.



● (छायाचित्र : धम्मशील सावंत)

रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने व अनुपम कुलकर्णी यांच्या सौजन्याने ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष व कमळ नागरी पतसंस्थेचे संस्थापक गिरीश तुळपुळे, अनुपम कुलकर्णी, अभिजीत तुळपुळे व अभिजीत कॅरम क्लबचे वरिष्ठ सहकारी उपस्थित होते. यावेळी सुरको कॅरम कंपनीचे तब्बल १२ कॅरम बोर्ड स्पर्धेसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. स्पर्धेत कामोठे येथील राजेश गोहिल यांनी प्रथम क्रमांक पटकावत मानांकन पटकावले. तर, पनवेलच्या अश्रफ खान यांनी द्वितीय आणि कामोठे येथील वैभव शिंदे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे पुरुष एकेरी गटातील विजेत्यासाठी अनुपम कुलकर्णी यांच्यावतीने १० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक व चषक देण्यात आले. तसेच, स्पर्धेतील पहिल्या १६ क्रमांकाच्या खेळाडूंना देखील पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेचे संपूर्ण नियोजन अभिजीत तुळपुळे व अभिजीत कॅरम क्लबच्या खेळाडूंनी केले. यावेळी आंतरराष्ट्रीय पंच आशिष बागकर यांनी दोन दिवस पंच म्हणून जबाबदारी सांभाळली, तर राज्यस्तरीय पंच देविदास सिनलकर यांनी सहाय्यक पंच म्हणून काम पाहिले. स्पर्धा नियोजित वेळेत सुरू होऊन नियोजित वेळेतच पार पडली.

# पाकिस्तान संघाला मूर्खपणा नडला

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

पाकिस्तानची हॉकी विश्वचषक स्पर्धेची सुरुवात निराशाजनक राहिली. त्यांना इंग्लंडकडून ४-१ असा पराभव पत्करावा लागला. इंग्लंडने १२व्या मिनिटाला आपला पहिला गोल केला आणि त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. पाकिस्तानने अखेर ५१व्या मिनिटाला गोल केला. या सामन्यादरम्यान पाकिस्तानने मुर्खपणा केला आणि त्यामुळे कर्णधार अबु बकरवर रेफरीने कारवाई केली. या सामन्यादरम्यान पाकिस्तानचे खेळाडू पेनल्टी कॉर्नरसाठी लागणारे संरक्षक साहित्य चेंजिंग रूममध्ये विसरले.



त्यामुळे कर्णधार अबू बकरला ग्रीन कार्ड मिळाले, त्यामुळे त्याला दोन मिनिटे मैदानाबाहेर बसावे लागले. पाकिस्तानचा माजी कर्णधार सलमान अकबरने खेळाडूंच्या या मूर्खपणावर ताशेरे ओढले. तो म्हणाला की, ''व्वा. पाकिस्तान हॉकीच्या नावावर आणखी एक नकोसा विक्रम. खेळाडू पेनल्टी कॉर्नरसाठीचे संरक्षक साहित्य ड्रेसिंग रूममध्ये विसरले,'' असे सलमानने पोस्ट लिहिली. आंतरराष्ट्रीय हॉकीच्या सर्वात मोठ्या मंचावर पेनल्टी कॉर्नरसाठी आवश्यक असलेली संरक्षक उपकरणे विसरणे हे अजिबातच चालणार नाही. तयारी म्हणजे केवळ डावपेच, तंदुरुस्ती आणि कौशल्ये नसते. त्यात शिस्त आणि संघटन यांचाही समावेश असतो. दुर्दैवाने, अशा प्रसंगांमुळे आपण मोठ्या स्पर्धेसाठी खरोरच किती तयारी केली आहे, हे समजते, असेही तो पुढे म्हणाला.

# विश्वचषकासाठी आयसीसीचा मास्टरप्लॅन

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद महात्मा गांधी यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी गांधी जयंतीच्या दिवशीच या मोठ्या स्पर्धेचा शुभारंभ करण्याची योजना आखत आहे. विशेष म्हणजे, महात्मा गांधी यांचा दक्षिण आफ्रिकेशी असलेला ऐतिहासिक संबंध पाहता या तारखेला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे दि.२ ऑक्टोबर, २०२७ रोजी विश्वचषक सुरू झाल्यास क्रिकेटच्या इतिहासात हा एक वेगळाच क्षण ठरेल. शांती आणि अहिंसेचा संदेश जगभर पोहोचवणाऱ्या महात्मा गांधींना कडून ही अनोखी श्रद्धांजली ठरू शकते.

**वेल्स संघाला ३-१ ने नमवले** | **पुल डीमध्ये अव्वल क्रमांक**

# भारतीय संघाची दणदणीत सुरुवात

। ॲम्स्टेलवीन । वृत्तसंस्था ।

हॉकी विश्वचषक स्पर्धेला शनिवार दि.१५ ऑगस्टपासून दणक्यात सुरुवात झाली. या स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी भारताचा सामना नेदरलँड्समधील ॲम्स्टेलवीन येथे वेल्स संघाविरुद्ध पार पडला. या संपूर्ण सामन्यात भारतीय संघाने वर्चस्व ठेवताना दणदणीत विजयासह स्पर्धेत आपल्या मोहिमेची सुरुवात केली. भारतीय संघाने वेल्सला ३-१ अशा फरकाने नमवले. त्यामुळे पुल डीमध्ये भारताने आघाडी घेतली आहे.



या सामन्यात भारताने सुरुवातीपासूनच आक्रमण केले; परंतु, सुरुवातीला वेल्सने चेंडूवर ताबा ठेवण्यात यश मिळावले. मात्र, ८ व्याच मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला. त्यावेळी हरमनप्रीत मैदानातून बाहेर असल्याने संजयने जबाबदारी घेतली. पहिल्यावेळी चेंडू रशरच्या पायात आल्याने पुन्हा पेनल्टी कॉर्नर मिळाला. यावेळी मात्र संजयने कोणतीही चूक न करता ड्रॅगफ्लिक करत भारतासाठी पहिला गोल केला. त्यानंतर ११ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवर कर्णधार हरमनप्रीतने त्याच्या नेहमीच्या कौशल्याने गोलकिपरच्या डाव्या बाजूला चेंडू मारत भारतासाठी दुसरा गोल नोंदवला. त्यामुळे पहिल्या क्वार्टर संपला, तेव्हाच भारत २-० अशा फरकाने आघाडीवर होता. दुसऱ्या क्वार्टरमध्ये मात्र वेल्सने भारताला चांगली लढत दिली. भारताने संधी निर्माण करण्याचा प्रयत्न केला; परंतु, दुसऱ्या क्वार्टरमध्ये एकही गोल झाला नाही. तिसऱ्या क्वार्टरमध्ये वेल्सने आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारताचा बचावही चांगला राहिला. भारताचा सर्वात अनुभवी खेळाडू मनप्रीत सिंगच्या प्रयत्नांमुळे ४२ व्या मिनिटाला पुन्हा पेनल्टी कॉर्नर मिळाला. त्याचा फायदा हरमनप्रीतने घेतला आणि ताकदवान ड्रॅगफ्लिक करत त्याने त्याचा सामन्यातील दुसरा, तर भारताचा तिसरा गोल केला. त्यामुळे भारताला तिसऱ्या क्वार्टरनंतर ३-० अशी चांगली आघाडी मिळाली.

चौथ्या आणि अखेरच्या क्वार्टरमध्येही भारताने वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न केला. तरी ५५ व्या मिनिटाला फरलाँगच्या ड्रॅगफ्लिकवर भारताचा गोलकिपर मोहितने अप्रतिम बचाव केला. मात्र, ५६ व्या मिनिटाला स्टिक टॅकलसाठी पंचांनी वेल्सला पेनल्टी स्ट्रोक दिला. त्यावेळी थोडा गोंधळ झाला. शिट्टी हातून निसटल्याने त्यांना ती वाजवता आली नाही. त्यावेळी मोहितने गोल होण्यापासून वाचवण्यासाठी स्वत:ला झोकू दिले. परंतु, सॅम वेल्शने गोल केला. टीव्ही पंचांच्या मते, शिट्टी वाजण्यापूर्वीच चेंडू गोलमध्ये गेला होता, त्यामुळे वेल्सला गोल मिळाला. मात्र, शेवटी सामना ३-१ असा भारताने जिंकला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)